## गुंतवणूकदारांची २२८३ कोटींची फसवणूक

■ **वृत्तसंस्था, भोपाळ, दि. २१ :**
मध्य प्रदेशसह देशातील ७ राज्यांमध्ये ऑनलाइन गुंतवणुकीच्या नावाखाली हजारो गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या दोन आरोपींना भोपाळ एसटीएफने (स्पेशल टास्क फोर्स) दिल्लीतून अटक केली आहे.

आरोपी यॉर्कर एफएक्स आणि यॉर्कर कॅपिटल कंपनीमध्ये गुंतवणूक केल्यावर ६ ते ८ टक्के निश्चित नफा देऊन लोकांना आमिष दाखवत असत. आरोपींनी आतापर्यंत २२८३ कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. आरोपींना ही रक्कम १६ खात्यांमध्ये मिळाली आहे. एसटीएफने ९० कोटी रुपये जप्त केले आहेत. आरोपी ही रक्कम परदेशी खात्यांमध्ये ट्रान्सफर करण्याचा कट रचत होते.


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com








* वर्ष ५० * अंक ३५७ * | * अमरावती * | रविवार, दिनांक २२ जून २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## थोडक्यात..

### भारताचे मौन अस्वस्थ करणारे



■ **नवी दिल्ली :** काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी इस्रायलने इराणवरील हल्ल्याचा निषेध केला आहे. त्यांनी द हिंदूमधील एका लेखात लिहिले आहे की, इस्रायल स्वतः एक अण्वस्त्रसंपन्न देश आहे, परंतु अण्वस्त्रे नसतानाही इराणला लक्ष्य केले जात आहे. हा इस्रायलचा दुटप्पीपणा आहे.
त्यांनी असेही म्हटले की इराण हा भारताचा जुना मित्र आहे आणि अशा परिस्थितीत भारताचे मौन अस्वस्थ करणारे आहे. गाझामधील विध्वंस आणि इराणमधील हल्ल्यांबद्दल भारताने स्पष्ट, जबाबदार आणि मजबूत आवाजात बोलले पाहिजे. अजून खूप उशीर झालेला नाही. १३ जून २०२५ रोजी इस्रायलने इराणच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन केले आणि एकतर्फी हल्ला केला, जो बेकायदेशीर आणि प्रादेशिक शांततेसाठी धोकादायक आहे. काँग्रेस इराणमधील या हल्ल्यांचा निषेध करते, ज्यामुळे प्रादेशिक आणि जागतिक स्तरावर गंभीर अस्थिरता आणि संघर्ष निर्माण होऊ शकतो, असे त्यांनी म्हटले आहे.

### १० वर्षाच्या मुलावर बलात्कार करून हत्या

**अलीगड :** अलिगडमध्ये एका तरुणाने त्याच्या मित्राच्या १० वर्षांच्या भावावर बलात्कार करून त्याची हत्या केली. मित्राला धडा शिकवण्यासाठी त्याने त्या मुलाला शेतात नेले. तिथे त्याने त्याला नशायुक्त पदार्थ पाजून बेशुद्ध केले. त्याच्यावर बलात्कार केला, नंतर दोरीने गळा दाबून खून केला. ओळख पटू नये म्हणून शरीरावर पेट्रोल ओतून ते जाळले. नंतर शेतात खड्डा खोदून मृतदेह पुरला. शरीरात मीठही मिसळले जेणेकरून ते लवकर कुजेल.
आरोपी तीन दिवस पोलिसांना दिशाभूल करत राहिला. तो पोलिस आणि कुटुंबासह मुलाचा शोध घेत राहिला, परंतु पोलिसांना त्याच्या कृतीवर संशय आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.
त्याची चौकशी केली असता त्याने हत्येची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी त्याने सांगितलेल्या ठिकाणी खड्डा खोदला आणि मृतदेह बाहेर काढला आणि पोस्टमॉर्टमसाठी पाठवला. हे प्रकरण इग्लास पोलिस स्टेशन परिसरातील आहे.

# भारत योगमय !

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई / नागपूर, दि. २१ :**
शनिवारी जगभरात ११ वा योग दिन साजरा करण्यात आला. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या मते, १९१ देशांमध्ये १३०० ठिकाणी २ हजारांहून अधिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

या वर्षीच्या योग दिनाची थीम 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' आहे. योग दिनानिमित्त, जम्मू आणि काश्मीरमधील चिनाब पूल, लाल चौक अशा देशातील अनेक प्रसिद्ध ठिकाणी लोकांनी एकत्र योगासने केली.

देशभरातील १ लाखाहून अधिक ठिकाणी झालेल्या या कार्यक्रमाला एकत्रितपणे 'योग संगम' असे नाव देण्यात आले हाते. यामध्ये २ कोटींहून अधिक लोक सहभागी झाल्याची माहिती आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह देशातील अनेक नेते, सेलिब्रेटी आणि सामान्य नागरिकांनीही या योगदिनात हिरीरीने भाग घेतला.



*मुंबईत कुलाबा येथे गेट वे ऑफ इंडियासमोर मुंबई पोलीस दलाने सकाळी योगा केला.*

## शेतकऱ्यांना योग्यवेळी कर्जमाफी

### सरकार आपला एकही शब्द फिरवणार नाही

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २१ :**
सरकार योग्यवेळी शेतकरी कर्जमाफीचा आपला शब्द पूर्ण करेल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा दिली. सरकार दिलेला आपला एकही शब्द फिरवणार नाही. शेतकरी कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी घेतला जाईल, असे ते शेतकऱ्यांना आश्वस्त करताना म्हणालेत. यावेळी त्यांनी जगातील पहिल्या ६०० विद्यापीठांत नाव आल्याबद्दल पुणे विद्यापीठाचे कौतुकही केले.

फडणवीस यांनी शनिवारी येथे आयोजित जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी शेतकरी कर्जमाफीसह पुणे विद्यापीठाची यशस्वी घोडदौड, पालखी सोहळा, शेतकरी समस्या आदी विविध मुद्यांवर भाष्य केले.

वारी ही महाराष्ट्राची प्राचीन परंपरा आहे. विठ्ठल दर्शनासाठी लाखो वारकरी पायी चालत येतात. ते सर्वजण आज पुण्यात थांबलेत. आम्ही या कार्यक्रमाशी जोडून आज योगाभ्यास केला. पुण्यातील महाविद्यालय यात सहभागी झाले. भव्य कार्यक्रम झाला. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. आज त्यांच्यामुळेच योग आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वीकारण्यात आला आहे, असे ते म्हणाले.

पत्रकारांनी त्यांना पुणे विद्यापीठाचा दर्जा वाढला, पण विभागांची स्थिती फारशी चांगली नाही, प्राध्यापकांचाही तुटवडा आहे, असा प्रश्न विचारला. त्यावर ते म्हणाले, सर्वप्रथम मी पुणे विद्यापीठाचे मनापासून अभिनंदन करतो. जगातील पहिल्या ६०० विद्यापीठांत आज पुणे विद्यापीठ आहे. मला अपेक्षा आहे की, पुढील वर्षी किंवा २ वर्षांत पहिल्या ५०० विद्यापीठांत आपली विद्यापीठे असतील.



जगातील पहिल्या ५०० विद्यापीठांना मान असतो. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची त्या दिशेने वाटचाल सुरू आहे. येथील कुलगुरू व्यवस्थापन परिषद, सिनेटर, प्राध्यापक यांचे कार्य कौतुकास्पद आहे. तुम्ही ज्या तुटवड्याविषयी प्रश्न केला, त्याविषयी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यापूर्वीच सर्वप्रकारच्या मान्यता दिल्या आहेत.

आळंदी संस्थानच्या विश्वस्तांनी आज पत्रकारांना हिनकस वागणूक दिली. त्याचे काही व्हिडिओ समोर आलेत. मुख्यमंत्र्यांनी त्यावरही भाष्य केले. ते म्हणाले, अशा गोष्टी पुन्हा घडणार नाहीत याची काळजी घेतली जाईल. अनेकदा स्ट्रेस, तणावातून अशा गोष्टी घडतात. पण त्याची पुनरावृत्ती होणार नाही असे ते म्हणाले.

## एअर इंडियाच्या ३ अधिकाऱ्यांची हकालपट्टी

**अहमदाबाद प्लेन क्रॅश**

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :**
अहमदाबाद विमान अपघातानंतर, डीजीसीएने शनिवारी एअर इंडियाला ३ अधिकाऱ्यांना काढून टाकण्याचे आदेश दिले. यामध्ये विभागीय उपाध्यक्षांसह तीन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. डीजीसीएने पायलटला क्रू शेड्युलिंग आणि रोस्टरिंगशी संबंधित भूमिका आणि जबाबदाऱ्यांपासून मुक्त करण्यास सांगितले आहे.

या अधिकाऱ्यांमध्ये विभागीय उपाध्यक्ष चुडा सिंग, क्रू शेड्युलिंग करणाऱ्या मुख्य व्यवस्थापक पिंकी मित्तल आणि क्रू शेड्युलिंगच्या नियोजनाशी संबंधित पायल अरोरा यांचा समावेश आहे.

पीटीआय वृत्तसंस्थेनुसार, २० जून रोजी जारी केलेल्या आदेशात एअर इंडियाला तात्काळ कारवाई करण्यास सांगितले आहे. १२ जून रोजी अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातानंतर हा निर्णय घेण्यात आला.

लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान एआय-१७१ टेकऑफनंतर लगेचच कोसळले. विमान मेडिकल कॉलेज हॉस्टेलला धडकले, ज्यामध्ये प्रवाशांसह एकूण २७० लोकांचा मृत्यू झाला.

एअर इंडियाने एका निवेदनात म्हटले आहे की त्यांनी डीजीसीएचा आदेश स्वीकारला आहे आणि त्याची अंमलबजावणी केली आहे. अनिवार्य उड्डाण अनुभव आणि परवाना नियमांचे उल्लंघन, वेळापत्रक प्रोटोकॉलचे पालन न करणे असे आरोप त्यांच्यावर आहेत.

एअर इंडियाने या अधिकाऱ्यांना क्रू शेड्युलिंग आणि रोस्टरिंगशी संबंधित सर्व जबाबदाऱ्यांमधून तात्काळ काढून टाकावे, शिस्तबद्ध कारवाई सुरू करावी. १० दिवसांच्या आत डीजीसीएला कळवावे, असे आदेशात म्हटले आहे.

## मतदान केंद्राचे फुटेज सार्वजनिक करता येणार नाही

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :**
निवडणूक आयोगाने शनिवारी म्हटले आहे की, मतदान केंद्रांच्या वेबकास्टिंगचे सीसीटीव्ही फुटेज शेअर करणे योग्य नाही. यामुळे मतदार आणि गट ओळखणे सोपे होईल. मतदार आणि गैर-मतदार दोघेही असामाजिक घटकांकडून दबाव, भेदभाव आणि धमक्यांना बळी पडू शकतात.

आयोगाने म्हटले आहे की, सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करणे हे लोकप्रतिनिधी कायद्यातील कायदेशीर तरतुदी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन असेल. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हेराफेरी झाल्याच्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या दाव्यावरील सीसीटीव्ही फुटेज शेअर करण्याच्या मागणीवर आयोगाचे हे उत्तर आले आहे. यावर काँग्रेस आणि राहुल गांधी यांनी सडकून टीका केली आहे.

## भाजपचा निवडणूक खर्च दीड हजार कोटी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :**
२०२४च्या लोकसभा आणि त्यासोबतच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने सर्वाधिक पैसे खर्च केले. पक्षाने सुमारे १,४९४ कोटी खर्च केले, जे एकूण निवडणूक खर्चाच्या ४४.५६% आहे.

काँग्रेसने ६२० कोटी खर्च केले आणि खर्चाच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर राहिले, जे एकूण खर्चाच्या १८.५% आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (अडक्र) च्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. या अहवालात एकूण ३२ राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या खर्चाचे विश्लेषण करण्यात आले आहे.

१६ मार्च ते ६ जून २०२४ दरम्यान झालेल्या लोकसभा आणि चार राज्यांच्या निवडणुकांमध्ये (आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, ओडिशा आणि सिक्कीम) एकूण ३,३५२.८१ कोटी रुपये खर्च झाले. यापैकी केवळ राष्ट्रीय पक्षांचा खर्च २,२०४ कोटी रुपये होता, जो एकूण खर्चाच्या ६५.७५% आहे.

## भीषण अपघातात चौघांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, सिंधुदुर्ग, दि. २१ :**
जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील नारिंग्रे गावाजवळ शुक्रवारी सकाळी एसटी बस आणि रिक्षामध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात रिक्षातील चौघांचा जागीच मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी झाला.

मृतांमध्ये मालवण तालुक्यातील आचरा येथील रिक्षा व्यावसायिकांचा समावेश आहे. संकेत सदानंद घाडी (३५), संतोष रामजी गावकर (३५) रोहन मोहन नाईक (३५), आणि सोनू कोळंबकर (४५) अशी मृतांची नावे आहेत. तर रघुनाथ बिनसाळे हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर गोवा येथील बांभुळी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

रिक्षाचालकासह प्रवासी मद्यधुंद अवस्थेत होते. याच कारणामुळे रिक्षावरील नियंत्रण सुटून एसटी बसला समोरासमोर धडक दिल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी तत्काळ धाव घेतली आणि जखमींना रुग्णालयात पोहोचवले.

**डंपरखाली आल्याने दुचाकीस्वार ठार**

कल्याण-पुणे लिंक रोडवर विजय नगर परिसरात आणखी एक अपघात घडला. डंपरला ओव्हरटेक करताना दुचाकीने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या सिलिंडर गाडीला धडक दिली. यामुळे दुचाकीस्वार डंपरच्या चाकाखाली येऊन जागीच ठार झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

**कारच्या धडकेत महिला ठार**

नवी मुंबईच्या न्यू पनवेल परिसरात एका धनाढ्याच्या १९ वर्षीय मुलीने मर्सिडीज कारने स्कुटीवरुन जाणाऱ्या दोघांना उडवले. या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला आहे. खारघर पोलिसांनी मर्सिडीज बेंझ कार चालवणाऱ्या मुलीला अटक केली आहे. या मुलीचे नाव तिथी सिंग (१९) असे असून ती इंजिनिअरिंगची विद्यार्थिनी आहे. या अपघातामध्ये रेखा यादव (५०) या महिलेचा मृत्यू झाला आहे. तर गोपाल यादव (५४) गंभीर जखमी झाले आहेत.

## इस्रायली हल्ल्यात इराणचा ड्रोन कमांडर ठार

**आतापर्यंत मारले गेले १२ अधिकारी**

**युद्ध थांबवण्यास इस्रायलला सांगणार नाही : ट्रम्प**



■ **वृत्तसंस्था**
**तेहरान/तेल अवीव, दि. २१ :**
इस्रायलने इराणचा ड्रोन कमांडर अमीन पोर जोडखी याला हवाई हल्ल्यात ठार मारल्याचा दावा केला आहे. यापूर्वी १३ जून रोजी इस्रायलने ड्रोन युनिट प्रमुख तहर फर यांना ठार मारले होते. तेव्हापासून जोडखी ड्रोन युनिटचे प्रमुख होते.

इस्रायलने आतापर्यंत इराणच्या १२ हून अधिक लष्करी अधिकाऱ्यांना ठार मारले आहे. यामध्ये इराणी लष्करप्रमुख मोहम्मद बघेरी, आयआरजीसी प्रमुख हुसेन सलामी आणि इतर अनेक मोठ्या नावांचा समावेश आहे.
दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की ते इस्रायलला युद्ध थांबवण्यास सांगणार नाहीत. ते म्हणाले की जर कोणी जिंकत असेल तर त्याला थांबवणे कठीण आहे.

इराण आणि इस्रायलमधील युद्ध सुरू आहे. इराणने सकाळी तेल अवीव आणि इस्रायलमधील इतर शहरांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. यामुळे अनेक इमारतींचे नुकसान झाले आहे.

त्याच वेळी, इस्रायलनेही प्रत्युत्तर दिले आणि इराणमधील इस्फहानमधील कोम येथे क्षेपणास्त्र हल्ले केले. २ जणांचा मृत्यू झाला आहे आणि ४ जण जखमी झाले आहेत.

गेल्या ८ दिवसांत इस्रायलमध्ये २४ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ९०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. इराणमध्ये ६५७ जणांचा मृत्यू झाला आहे आणि २००० हून अधिक जण जखमी झाले आहेत. ही आकडेवारी वॉशिंग्टनस्थित इराणी मानवाधिकार गटाने दिली आहे. इराणहून ३१० भारतीय परतले आहेत.

संयुक्त राष्ट्रांमधील इराणचे राजदूत अमीर सईद इरावनी यांनी इस्रायली हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या इराणी मुलांचे पोस्टर दाखवले.

## राज्यात हिंदी भाषा लादण्याचा छुपा अजेंडा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**
महाराष्ट्रात सध्या हिंदी भाषा सक्तीवरून शिवसेना ठाकरे गटाने देखील याविरोधात आवाज उठवण्यास सुरू केले.

आता ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी देखील भाजपवर सडकून टीका केली आहे. हिंदी भाषा लादण्याचा छुपा अजेंडा असल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

कुठल्याही भाषेला विरोध नाही, पण त्या भाषेच्या सक्तीला विरोध आहेच! आपल्या लक्षात येत आहे का की मागल्या दाराने मराठी द्वेषी भाजपचे काय चालले आहे? असा सवाल त्यांनी केला आहे.

## ४७१ धावांवर गुंडाळला भारताचा डाव

### कर्णधार शुभमन गिलसह ऋषभ पंत आणि यशस्वी जैस्वालने ठोकले शतक






■ **वृत्तसंस्था, लीड्स, दि. २१ :**
तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफीच्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात भारताचा डाव ४७१ धावांवर संपला. संघाने शेवटच्या ७ विकेट्स ४१ धावा करून गमावल्या. शनिवारी, हेडिंग्ले क्रिकेट ग्राउंडवर सुरू असलेल्या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी, भारतीय संघाने ३५९/३ च्या धावसंख्येने खेळण्यास सुरुवात केली.

कर्णधार शुभमन गिलने १४७, ऋषभ पंतने १३४ आणि यशस्वी जैस्वालने १०१ धावा केल्या. केएल राहुलने ४२ धावांचे योगदान दिले. लंचपूर्वी गिल आणि पंत बाद झाल्यानंतर भारतीय संघाचा खालचा मधला क्रम कोसळला.

८ वर्षांनी भारतीय संघात पुनरागमन करणाऱ्या करुण नायरला आपले खातेही उघडता आले नाही. रवींद्र जडेजा ११ धावा काढून बाद झाला आणि शार्दुल एक धाव काढून बाद झाला.
इंग्लंडकडून कर्णधार बेन स्टोक्स आणि जोश टंग यांनी प्रत्येकी ४ विकेट घेतल्या. ब्रायडन कार्स आणि शोएब बशीर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. पावसामुळे इंग्लडचा डाव सुरू झालेला नव्हता.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महिला मतांवर डोळा

# लाडक्या बहिणींना ९ टक्के व्याजाने १ लाखापर्यंत कर्ज

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महिलांच्या मतपेढीवर डोळा ठेवत लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांसाठी नवे पाऊल उचलण्यात आले आहे. लाडक्या बहिणींसाठी राज्य सरकारकडून विशेष आर्थिक यंत्रणा उभी करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यभर महिला नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात येणार आहेत. तसेच महिलांच्या आर्थिक सक्षमीकरण्यासाठी मुंबई बँक आणि विविध महामंडळाकडून महिलांना ९ टक्के अल्प व्याजदराने कर्जपुरवठा केला जाणार आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा महायुती सरकारने लाडक्या बहिणींना खुश करण्याचा प्रयत्न केला आहे.

राज्यात लाडकी बहीण योजनेचे अडीच कोटी लाभार्थी आहेत. दर महिन्याला लाडक्या बहिणींच्या बँक खात्यावर दीड हजार रुपये जमा होत आहेत. लाडकी बहिण योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर आर्थिक ताण सहन करावा लागत आहे.

दर महिन्याना लाडक्या बहिणींना लाभ देताना सरकारची दमछाक होत आहे त्यातच विरोधकांकडून लाडकी बहिण योजना बंद होणार असल्याची टीका केली जात आहे, त्यातच आता महिलांच्या स्वयंरोजगारासाठी स्थानिक सहभागातून पतसंस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले की, या पतसंस्था सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि नियम १९६१ अंतर्गत नोंदणीकृत असतील. महिला व बालविकास विभागाच्या लाभार्थी यादीच्या आधारे सदस्यता दिली जाणार असून, प्रवर्तकांची पार्श्वभूमी तपासणे व केवायसी पूर्ण करणे अनिवार्य राहील. प्रत्येक संस्थेसाठी सहाय्यक निबंधक पालक अधिकारी म्हणून नेमण्यात येणार आहेत.

राज्यात शहरी व ग्रामीण स्तरावर महिलांच्या सहभागातून पतसंस्था स्थापन करण्यात येणार आहेत. यासाठी विविध स्तरांवर प्राथमिक सभासदांची संख्या व भागभांडवलाचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

महिलांच्या उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळ, महाराष्ट्र राज्य ओबीसी वित्त महामंडळ यांच्या योजनांचा समावेश करून सुसंगत आर्थिक पायाभूत रचना तयार करण्यात आली आहे. पात्र महिलांना १ लाख रुपये किंवा त्याहून अधिक रकमेचे कर्ज ९% दराने दिले जाणार आहे. इतर कर्जदारांसाठी हा दर १०.५० ते १३.५० टक्क्यांपर्यंत आहे.

अर्थतज्ज्ञ विश्वास उटगी यांनी सांगितले की, विधानसभेला लाडक्या बहिणींनी महायुतीला भरघोस मतदान केले. सरकारने मदतीच्या निकषात बसत नसलेल्या लाखो महिलांना वगळण्यात आले. त्यामुळे सामान्य महिलांमध्ये नाराजीचा सूर उमटला. त्याच्या भरपाईसाठी ही योजना आहे. अर्थात कर्जाचे वाटप पारदर्शक पद्धतीने कसे होणार? ९ टक्के दराने कर्ज घेणे किती महिला बचत गटांना परवडेल? हे मुद्दे योजनेचा पूर्ण आराखडा अभ्यासल्यावरच स्पष्ट होईल.

# योग करा, निरोगी रहा









## जिल्हाभरात उत्साहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (२१ जून)** – जिल्ह्याभरात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. शासन, प्रशासन व विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी मोठ्याप्रमाणात योग दिवसाचे आयोजन केले होते.

**'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग'**

अमरावती– 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' या संकल्पनेवर आधारित ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन आज अमरावती जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला. आयुष मंत्रालय, नवी दिल्ली व जिल्हा प्रशासन, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय क्रीडा संकुलाच्या इनडोअर सभागृहात या मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी आमदार संजय खोडके, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर प्रमुख उपस्थित होते. योग दिनानिमित्त विविध शासकीय व खाजगी संस्थांनी एकत्र येत सामूहिक योग सत्रात सहभाग घेतला.

आमदार संजय खोडके यांनी भाषणात सांगितले की, ङ्कआज संपूर्ण जगाने योग स्वीकारले असून तणावमुक्त व भयमुक्त जीवनासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राहते. विभागीय क्रीडा संकुलाच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे,ङ्ख असे ते म्हणाले.

विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी योगाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगताना, ङ्कयोग ही भारताची अमूल्य देणगी असून आजच्या युगातही पारंपरिक पद्धतीने योग केला जात आहे. लहान मुलांचा सहभाग पाहून आनंद झाला, असे नमूद केले.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनीही उपस्थितांना नियमित योग करण्याचे आवाहन केले. ङ्कयोगामुळे माणूस अंतर्बाह्य निरोगी राहतो. ही भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली अमूल्य भेट आहे, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमात जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग, महानगरपालिका, क्रीडा विभाग, श्री श्री रविशंकर यांची आर्ट ऑफ लिव्हिंग संस्था, शारीरिक शिक्षक संघटना, नेहरू युवा केंद्र, भारत स्वाभिमान ट्रस्ट, युवा भारत, किसान पंचायत, वंदे मातरम योग मंडळ तसेच इतर विविध क्रीडा व योग संस्थांचा सहभाग होता.

कार्यक्रमाची रूपरेषा माजी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रदीप शेट्टीये यांनी सादर केली. योग दिनाचे औचित्य साधून ईश्वरी गांजरे या बालिकेने रेखाटलेली सुंदर योग रांगोळी विशेष आकर्षण ठरली. तिचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर मान्यवरांचा पुष्पगुच्छ व योग पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, शिक्षण अधिकारी प्रिया देशमुख, नेहरू युवा केंद्राच्या स्नेहल बासुतकर, श्रीमती मोटवानी व इतर योगप्रेमी उपस्थित होते. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संयुक्त राष्ट्र संघातील भाषणानंतर आंतरराष्ट्रीय योग दिनाची सुरुवात झाली. तेव्हापासून दरवर्षी २१ जून रोजी हा दिवस जगभर योगप्रसारासाठी साजरा होतो. यंदाही अमरावती जिल्ह्यात विविध ठिकाणी योग सत्रांचे आयोजन करून नागरिकांना निरोगी जीवनशैलीकडे वळविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा






**खोलापूर** – योग ही केवळ कसरत नसून आत्मशोध व जीवनशैली घडवणारी प्रक्रिया आहे, या विचारांचा अंगीकार करत तक्षशिला अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालय, दारापूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी योगशास्त्राचे विविध पैलू प्रत्यक्ष अनुभवले.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि श्री. दादासाहेब गवई यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यानंतर योगशिक्षक भानुदासजी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, विविध योगासने, प्राणायाम, ध्यान आणि मौनप्रार्थना या सत्रांमध्ये सहभाग घेतला. या माध्यमातून त्यांनी शारीरिक, मानसिक व आत्मिक आरोग्याचा अनुभव घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले होते. मार्गदर्शन करताना ते म्हणाले, ङ्कआजचा योग दिन केवळ एक उत्सव नाही, तर आपल्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवण्याचा संकल्प आहे. योग ही भारताच्या प्राचीन परंपरेची अमूल्य देणगी आहे. तिचा सन्मान दररोजच्या कृतीतून होणे आवश्यक आहे.ङ्ख त्यांनी विद्यार्थ्यांना योगाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'योगाबद्दल माझा अनुभव' या विषयावर विचार मांडले. योगावर आधारित पोस्टर आणि घोषवाक्य सादर करत त्यांनी योग दिनाचे महत्व अधोरेखित केले. अनेक विद्यार्थ्यांनी योग सत्रातील शांततेचे क्षण अनुभवल्याचे सांगितले, ज्यामुळे कार्यक्रमाचा खरा आत्मा प्रकट झाला. सूत्रसंचालन रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष यावले यांनी केले. कार्यक्रमात डॉ. एस. टी. वरघट, डॉ. एन. एस. घोटकर, डॉ. बी. एस. शेटे, प्रा. ए. एस. बोंबटकर, प्रा. ए. ए. चिंचमलातपुरे, प्रा. पी. एस. देशपांडे, प्रा. ए. एन. कौशल, प्रा. डी. व्ही. अष्टेनकर, प्रा. एच. के. लोणपांडे, श्री. एच. ए. धुमाळे, पी. पी. बांगरे यांच्यासह सर्व प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तक्षशिला महाविद्यालयाने यंदाच्या योग दिनी 'योग म्हणजे शांततेचा अनुभव' या भावनेचा जागर करत विद्यार्थ्यांना एक सकारात्मक, आरोग्यपूर्ण जीवनशैलीकडे वळवण्याचा प्रयत्न केला. अशा कार्यक्रमांमुळे युवा वर्गात योगाविषयीची जाण वाढत असून, जीवनात मानसिक शांतता आणि शरीरसंपदा टिकवण्याच्या दृष्टीने ही एक सकारात्मक दिशा ठरत आहे.

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात योगासनाचे धडे





**अमरावती** – श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथे योगा विभागाच्या वतीने २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय आणि जागतिक योग दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम योगा हॉल येथे पार पडला. योग दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल जागरूकता निर्माण करत, योगाची शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक फळे अधोरेखित करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उल्हास देशमुख होते. यावेळी वरिष्ठ प्राध्यापक डॉ. पुष्पलता देशमुख तसेच योग क्षेत्रातील अन्य मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव (भाऊसाहेब) देशमुख व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व पुष्पार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रास्ताविक भाषण योग मार्गदर्शक डॉ. सरोजनी उंबरकर यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, २७ सप्टेंबर २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रस्तावावरून आणि आयुष मंत्रालयाच्या पुढाकाराने २१ जून हा दिवस 'जागतिक योग दिन' म्हणून घोषित करण्यात आला. भारतीय योग परंपरेचे महत्त्व, तिची प्रभावीता आणि जागतिक स्वीकार याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. यानंतर आयुष मंत्रालयाच्या प्रोटोकॉलनुसार सामूहिक योग सत्राला सुरुवात झाली. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्र येऊन योगाभ्यास केला. सत्रात उभे राहून, खाली बसून, पोटावर व पाठीवर केले जाणारे विविध योगासने, तसेच मान, खांदे, गुढगे, कंबर यांचे सूक्ष्म योगिक व्यायाम शिकवण्यात आले. प्राणायाम, अनुलोम-विलोम, ध्यान, फुफ्फुस विकसनाचे व्यायाम, सूर्यनमस्कार यासारख्या महत्त्वाच्या क्रियांचे प्रात्यक्षिक देखील घेण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. उल्हास देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले, ङ्कयोग हा दीर्घकालीन आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त मार्ग आहे. आजच्या दिनी संकल्प करून दररोज योगासने केल्यास शरीरास-ोबतच मनही संतुलित राहते. विद्यार्थ्यांनी स्वतःसह समाजातही योगाचे महत्त्व पोहोचवावे.ङ्ख कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सरोजनी उंबरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. चेतक शेंडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योग विभाग प्रमुख डॉ. उंबरकर, सहाय्यक ग्रंथपाल स्वाती न्याहाटकर, योग डेमोस्ट्रेटर सुरज वैद्य आणि तेजस हरमकर (इ.झ.एव. प्रथम वर्ष) तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप आयुष मंत्रालयाने सुचविलेल्या संकल्प व शांतीपाठाने करण्यात आला. या योग दिनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापकवर्ग आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## मालखेड येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे :** जागतिक योग दिनानिमित्त ग्रामपंचायत मालखेड व स्थानिक नागरिकांच्या सहभागातून योगा सत्र आयोजित करण्यात आले. आरोग्यविषयक जनजागृती आणि शारीरिक व मानसिक स्वास्थ्य वाढवण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या या उपक्रमात महिलांसह ज्येष्ठ नागरिक आणि युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आज २१ जून रोजी सकाळी जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात पार पडलेल्या या योग सत्रामध्ये विविध योगासने, श्वसन क्रिया व ध्यानधारणा यांचा सराव करण्यात आला. योग प्रशिक्षक अंगणवाडी सेविका सुषमा चौकडे यांनी मार्गदर्शन करत योगाच्या शास्त्रीय पद्धतीचे महत्त्व समजावून सांगितले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी, शिक्षक, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.

'केवळ आजारांवर मात करण्यासाठी नव्हे तर मानसिक आणि शारिरीक संतुलन ठेवण्यासाठी 'योग' हा फार महत्त्वाची भूमिका साकारतो. त्याचमुळे भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्व असलेल्या योगाला आज जगभरात मोठे महत्व मिळाले आहे. संपूर्ण जगासाठी योग दिनाची थीम 'मानवतेसाठी योग' आहे कोरोनाचा प्रभाव हा शरीरावरच नाही तर मानसिक आरोग्यावर ही याचा परिणाम खूप जास्त झाला म्हणून योगा केल्याने आपले शरीरच निरोगी राहत नाही तर मानसिक ताणतणाव ही कमी होतो. याच पार्श्वभूमीवर आज नववा आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला'

**शंकर थोरवे ग्रामपंचायत अधिकारी, मालखेड रेल्वे**

'समाजातील गरिबांपर्यंत योगा पोहचला तर ते आजारापासून वाचू शकतील. निरोगी आरोग्यासाठी केवळ औषधे व शस्त्रक्रिया पुरेशा नाहीत. त्यामुळे सरकार योगाभ्यासाच्या माध्यमातून लोकांचे आरोग्य कसे सुधारता येईल, यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे.'

**सुषमाताई चौकडे, अंगणवाडी सेविका**

'योगाचं पालन संपूर्ण जीवनभर केले पाहिजे. योग कधीही वय, रंग, जात-पात, धर्म-पंत, श्रीमंत-गरीब, प्रांत-देश असा भेदभाव करत नाही. योग सर्वांचा आहे आणि सर्व जण योगाचे आहेत.'

**लता लक्ष्मण पाटील, सरपंच ग्रामपंचायत, मालखेड रेल्वे.**




**अमरावती-येथील जोग स्टेडिअमवर ग्रामीण पोलीस विभागाकडून योग दिन साजरा करण्यात आला, यावेळी योगाचे धडे गिरवित असलेल्या महिला पोलीस.**

## शरीराचं रिमोट कंट्रोल म्हणजे योग- रविराज देशमुख





अमरावती-'योग ही आपल्या शरीराचं रिमोट कंट्रोल आहे. योग केवळ आसनं नाहीत, तर आरोग्य राखण्याचा मंत्र आहे' असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे अमरावती जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख यांनी केलं. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त वलगाव येथे आयोजित योगसाधना कार्यक्रमात ते बोलत होते.

२१ जून रोजी संपूर्ण जगभरात ११वा आंतरराष्ट्रीय योग दिन 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' या घोषवाक्याखाली साजरा करण्यात आला. याच अनुषंगाने भाजपा अमरावती ग्रामीणच्या वतीने वलगाव येथे जिल्हास्तरीय योगसाधनेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात योग शिक्षक संजय लाने यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान प्रकारांचे सादरीकरण झाले.

या कार्यक्रमात मनोज खवड, वृषाली खोंड, श्रीराम उंबरकर, प्रमोद विघने, गजानन कडू, सुधीर ठाकरे, डॉ. कैलास बोरसे यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमात बोलताना देशमुख म्हणाले, 'योगामुळे मन:शांती मिळते, शरीर सुदृढ राहते आणि जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. वजन नियंत्रणात ठेवणे, तणाव कमी करणे, मन स्थिर ठेवणे हे सर्व फायदे योगामुळे मिळतात. त्यामुळे प्रत्येकाने दररोज काही वेळ योगासाठी द्यावा.

योग दिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रमही घेण्यात आला. पर्यावरण रक्षणाचे संदेश देणाऱ्या या उपक्रमात वलगाव परिसरात विविध प्रकारची झाडं लावण्यात आली. या उपक्रमातही अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी प्रभाकर किलोर, मोहन जोशी, सागर काळे, संतोष खोहरे, विनोद माने, अनिल सिकची यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.

# वृत्त प्रकाशित होताच त्या झाडाच्या फांद्या कापल्या

**‘दैनिक महासागर’च्या बातमीची तत्काळ दखल   सुटीच्या दिवशी मनपा प्रशासन उतरले रस्त्यावर**




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.२१)–** अंबापेठ परिसरातील साहू बिल्डिंगसमोर असलेल्या झाडाच्या धोकादायक फांद्या अखेर कापण्यात आल्या आहेत. ‘दैनिक महासागर’मध्ये शनिवारी(दि.२१) या समस्येबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर अवघ्या काही तासांत महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने तत्काळ कारवाई करत नागरिकांचा संभाव्य धोका टाळला.

या भागातील साहू बिल्डिंग परिसर नाश्त्याच्या ठिकाणी म्हणून ओळखला जातो. येथे दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी, महिला व दुकानदार यांचा वावर असतो. मात्र, या इमारतीसमोर असलेल्या एका मोठ्या झाडाच्या वाकलेल्या फांद्या थेट विद्युत खांब व तारांवर जाऊन अडकल्या होत्या. त्यामुळे प्रत्येक वेळी जोराचा वारा सुटला, की लाईन खंडित होणे, दुकानांचे व्यवहार थांबणे, नागरिकांच्या हालचालींना अडथळा निर्माण होणे अशा समस्या निर्माण होत होत्या.

### वर्षभरापासून प्रस्तावित होती कारवाई

या बाबत ‘दैनिक महासागर’ने वेळेवर धोका ओळखून वृत्त प्रसिद्ध केले. त्यानंतर, महापालिकेच्या उद्यान विभागाने तातडीने झाडाचे निरीक्षण करून, शनिवारी दुपारी संबंधित फांद्या कापण्याची कारवाई पूर्ण केली. गेल्या वर्षभर कोणतीही कार्यवाही न झालेल्या या समस्येची अचानक दखल घेऊन तत्परतेने उपाययोजना केल्याबद्दल नागरिक व व्यापा?्यांनी महापालिकेचे आभार मानले. या झाडाखाली नियमितपणे दुचाकीस्वार, महिला, विद्यार्थी यांचा वावर असतो. अशा परिस्थितीत जर एखाद्या दिवशी झाड कोसळले असते किंवा विद्युत तारा तुटल्या असत्या, तर गंभीर अपघात किंवा जीवितहानीची शक्यता नाकारता आली नसती. अंबापेठमधील नागरिकांनी याप्रकरणी ’दैनिक महासागर’चे तसेच महापालिकेचे आभार मानले.



# गोवंश कत्तल, एका आरोपीस अटक

**मास व कातड्यासह २९,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त**




**महासागर प्रतिनिधी**

**मोशी,(दि.२१)–** मोशी शहरात गोवंश वाहतूक आणि कत्तल संबंधित घटना सातत्याने वाढत असून, पोलिसांकडून त्यावर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याच दरम्यान, २० जून रोजी सायंकाळी मोशी पोलिसांनी दर्गा मोहल्ल्यातील एका घरावर छापा टाकत गोवंश कत्तल प्रकरण उघडकीस आणले.

गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी न्याज अहमद मोहम्मद हनीफ (वय ३६) यांच्या घराची झडती घेतली असता, ७० किलो गोवंश मांसाचे तुकडे, १० नग कातडे आणि कत्तलीसाठी वापरले जाणारे साहित्य असा एकूण २९,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पशुधन विकास अधिकारी मनीष पुंड आणि दोन पंचांच्या उपस्थितीत करण्यात आली. आरोपी न्याज अहमद मोहम्मद हनीफ याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ३२५, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम ५, ५/ब, ५/क, ९, ९/अ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई मोशी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईदरम्यान पीएसआय अमोल बुरकुल, हवालदार विजय वागतकर, मंगेश बदुकले, विलास कोहळे, महिला पोलीस प्रीती शिंदे, शिपाई सचिन भाकरे, स्वप्निल बायस्कर आणि छत्रपती करपते यांनी सहभाग घेतला.

# हत्यार घेऊन फिरणारा युवक अटकेत

**गुन्हे शाखा युनिट एकची कारवाई**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.२१)–** नागपुरीगेट पोलिस ठाणे हद्दीतील वलगाव मार्गावर परफेक्ट धरमकाटा ते असोरिया पेट्रोलपंप रस्त्यावर हातात हत्यार घेऊन फिरणा?्या एका युवकाला गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने अटक केली आहे. आरोपीकडून हत्यार जप्त करण्यात आले असून त्याचे नाव सय्यद अबुझर उर्फ मस्तान सय्यद सलीम (वय १९, रा. हबीब नगर क्र. २, अमरावती) असे आहे.

पोलिसांनी सय्यद अबुझरकडून एकूण तीन हत्यारे जप्त केली असून, त्यांची अंदाजे किंमत २ हजार ४०० रुपये सांगण्यात येत आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे व अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव, मनीष वाकोडे, प्रकाश झोपाटे, सतीश देशमुख, फिरोज खान, सचिन बहाले, प्रशांत मोहोड, नाझिमुद्दीन सय्यद, विकास गुडधे, सचिन भोयर, सूरज चव्हाण, निखील गेडाम, रंजीत गावंडे, अलिमोद्दीन खतिब, किशोर खेंगरे, अशोक खंगार यांच्या पथकाने केली.

# पाण्याच्या टँकरमध्ये जिवंत वीज प्रवाह

**शॉक लागून महिलेचा मृत्यू | मेळघाटातील पाणीटंचाई पुन्हा ऐरणीवर**




**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि.२१)–** मेळघाटातील भंडोरा गावात पाणीटंचाईमुळे टँकरवरून पाणी भरताना एका महिलेला विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (२१ जून) सकाळी घडली. मृत महिलेचे नाव अमरकली संजू भूसूम (वय ३२) असे आहे.

भंडोरा गावात पाणी टंचाई जाणवत असल्याने शनिवारी सकाळी १०:३० वाजता गावात ग्रामपंचायतच्या वतीने पाणी टँकरद्वारे आणण्यात आले होते. टँकरमधून पाणी काढण्याकरिता टँकर वीजेची मोटर बसविण्यात आली होती. काही वेळा करिता वीज पुरवठा खंडीत होवून पाईपमधून पाणी येणे बंद झाले. नळातून पाणी न आल्याने अमरकली भूसूम या महिलेने टँकरवर चढून पाण्याचा प्रवाह तपासण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी अचानक वीजपुरवठा सुरू झाला आणि मोटरमूळे टँकरमध्ये पसरलेला जीवंत विज प्रवाहाचा झटका लागल्याने अमरकली गंभीर जखमी झाली. त्यानंतर तिला चुरणी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात एक मुलगा व एक मुलगी असे दोन लहान मुलं आहेत.

### मेळघाटात कायमस्वरूपी पाणीटंचाईची गंभीर समस्या

मेळघाटातील अनेक गावांमध्ये वर्षानुवर्षे भीषण पाणीटंचाई आहे. पावसाळा सुरू झाला असला तरीही अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. यामुळे नागरिकांना दररोज जीव मुठीत धरून जगावे लागत आहे.

### स्थानिकांची संतप्त प्रतिक्रिया

या दुर्दैवी घटनेनंतर गावात शोककळा पसरली असून, प्रशासनाच्या हलगर्जीपणावर संताप व्यक्त होत आहे. ‘पाणीटंचाईचा बळी ही महिला ठरली असून, प्रशासनाने तत्काळ आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात,‘ अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# विनयभंगप्रकरणी आरोपीला एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.२१)–** भातकुली तालुक्यातील बैलमारखेडा येथील एका महिलेला तिच्याच घरात घुसून जबरदस्तीने शारीरिक सुखाची मागणी करणा?्या एका आरोपीस जिल्हा व सत्र न्यायालय क्र. ३, अमरावतीने दोषी ठरवत प्रत्येकी एक वर्ष सश्रम कारावास आणि प्रत्येकी ५ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. आरोपीने दंड न भरल्यास प्रत्येकी एक महिन्याची सश्रम शिक्षा भोगावी लागेल, असा स्पष्ट आदेशही न्यायालयाने दिला आहे. हा निकाल २१ जून रोजी जाहीर करण्यात आला. आरोपीचे नाव गणेश रामेश्वर राऊत (वय ४०, रा. बैलमारखेडा, ता. भातकुली) असे आहे.

सदर घटना ६ ऑक्टोबर २०१८ रोजी घडली होती. पीडिता घरात एकटी असताना आरोपीने घरात शिरून शारीरिक सुखाची मागणी केली. पीडितेने प्रतिकार करत घराबाहेर पळ घेतला. आरोपी देखील तिच्या मागे बाहेर पडला. परिसरातील शेजा?्यांनी हा प्रकार पाहिला आणि पीडितेने तात्काळ खोलापूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून भादंविच्या कलम ४५१, ३५४–अ (आय) व अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ (१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक डॉ. अविनाश पालवे यांनी केला आणि न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारच्या वतीने अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. कौस्तुभ लवाटे यांनी बाजू मांडली. खटल्यात सहा साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. साक्ष, पुरावे व युक्तिवाद ऐकून न्यायाधिश एच. एल. मनवर यांनी आरोपीस दोषी ठरवले. त्यानुसार भादंविच्या कलम ३५४–अ (आय) नुसार एक वर्ष सश्रम कारावास, ५ हजार रुपये दंड, तसेच कलम ४५१ नुसार, एक वर्ष सश्रम कारावास आणि पाच हजाराचा दंड व दंड न भरल्यास प्रत्येकी एक महिन्याची सश्रम शिक्षा तसेच न्यायालयाने आदेश दिला की, १० हजार रुपयांचा दंड अपील कालावधी संपल्यानंतर पीडितेला नुकसानभरपाई म्हणून दिला जावा. कोर्ट कार्यवाही दरम्यान पोलीस स्टेशन खोलापूरचे कोर्ट पैरवी अधिकारी ए.एस.आय. दिलीप सावरकर, राजेश गुल्हाने, तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालयातील ए.एस.आय. बाबाराव मेश्राम व पोलिस हवालदार रोशन दुधे यांनी सहकार्य केले.

### जळाल्याने महिलेचा मृत्यू

**अमरावती :** राहत्या घरी आग लागून जळालेल्या एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एमआर कॉलनीत १९ जुन रोजी सायंकाळी उघडकीस आली. माधुरी लक्ष्मण धोपाडे (५५, रा. एमआर कॉलनी, राजापेठ) असे मृतकाचे नाव आहे. राहत्या घरी आग लागल्याने माधुरी धोपाडे या ९५ टक्के जळाल्या होत्या.

# ऑनलाइन जुगार अड्ड्यांचे मुख्य संचालक अद्याप फरार

**धाडीत ७.९६ लाखांचा मुद्देमाल जप्त**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.२१)–** शहरातील राजकमल चौक परिसरात सुरू असलेल्या ऑनलाइन जुगार अड्ड्यांवर गुन्हे शाखा युनिट–२ च्या पथकाने शुक्रवारी सायंकाळी मोठी कारवाई करत जैन लॉटरी, जय लॉटरी आणि धनराज लॉटरी या तीन ठिकाणी एकाचवेळी धाड टाकली. कारवाईत ३० जणांना ताब्यात घेण्यात आले असून ७ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र या अड्ड्यांचे मुख्य संचालक अद्याप फरार असून, पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत.

गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, ‘चक्री’ आणि ‘घोडा’ या नावाने ऑनलाइन जुगार चालवले जात होते. यावेळी ११ जण जुगार खेळवताना, तर १९ जण प्रत्यक्ष जुगार खेळताना सापडले. अड्ड्यांवर कोणताही अधिकृत परवाना नसल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. झडतीत पोलिसांनी १ लाख ४५ हजार ७२० रुपये रोख, २२ मोबाईल फोन, टीव्ही, संगणक, खुर्च्या व जुगार साहित्य असा मिळून ७.९६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ताब्यात घेतलेल्यांमध्ये अनिल रामरख्यानी, निखिल निर्मल, सतीश नखववाल, प्रेम किरनापुरे, चरणसिंग पाटील, विक्की आठवले, आशिष पंचारिया, जय रामरख्यानी, कुणाल मिश्रा, प्रमोद धोंडे, रूपेश आलेकर आणि इतरांचा समावेश आहे. धनराज रामरख्यानी, बबलू आठवले, विजय जैन आणि शरद नागडिया हे मुख्य संचालक असून, हे चौकशीदरम्यान फरार असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी त्यांच्या अटकेसाठी मोहिम राबवली आहे.

# जि.प. शाळा की निसर्गरम्य पर्यटनस्थळ!

**शेंदुरजना खुर्द शाळा प्रवेशोत्सवासाठी सज्ज**



**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, (दि.२१ )–** शाळा म्हणजे केवळ शिक्षणाचे केंद्र असते, असा पारंपरिक समज नाकारत तिवसा तालुक्यातील शेंदुरजना खुर्द येथील जिल्हा परिषद शाळा एक वेगळीच ओळख निर्माण करत आहे. मुख्यमंत्री ‘माझी शाळा, सुंदर शाळा’ अभियानामध्ये विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक पटकावणारी ही शाळा आता प्रवेशोत्सवासाठी सज्ज झाली आहे.

शैक्षणिक गुणवत्ता देखील तितकीच लक्षणीय आहे. भारत टॅलेंट सर्च परीक्षेत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक, शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांची यशस्वी कामगिरी आणि प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी दिल्ली टूरमध्ये दोन विद्यार्थिनींची निवड ही या शाळेच्या शैक्षणिक प्रगतीची साक्ष देतात. या शाळेला भेट देण्यासाठी अनेक अधिकारी, पदाधिकारी व शिक्षकवृंद आवर्जून येतात आणि त्यांनी शाळेचे भरभरून कौतुक केले आहे.या सर्व यशामागे मुख्याध्यापक राजेंद्र होले, विषय शिक्षक संजय गावंडे, सहाय्यक शिक्षक विजय देशमुख, वैशाली दिवाण, अंगणवाडी सेविका पाचघरे, मदतनीस भोयर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश आमले, सरपंच आशिष माहुरे आणि संपूर्ण गावकऱ्यांचे अथक प्रयत्न आहेत. गटशिक्षणाधिकारी नितीन उंडे, शिक्षण विस्तार अधिकारी चंद्रशेखर रामटेके, केंद्रप्रमुख सुनील बोकाडे यांच्या मार्गदर्शनामुळेच ही शाळा आज शिक्षण क्षेत्रातील एक आदर्श ठरली आहे.





### ‘बचत बँक’ आणि ’एटीएम सुविधा’ लावतात आर्थिक शिस्त

या शाळेत पाऊल टाकताच पर्यटनस्थळाचा अनुभव येतो. विद्यार्थी आणि पालकांच्या मनात आकर्षण निर्माण करणारे वातावरण, स्वच्छ परिसर, रंगीत भिंती, शैक्षणिक सर्जनशीलतेने भरलेले वर्ग आणि सर्व आधुनिक सुविधा या शाळेचे खास वैशिष्ट्य आहेत. शाळेत स्मार्ट टीव्ही, डिजिटल बोर्ड, खुले वाचन कक्ष, विषयवार प्रयोगशाळा, संगणक विभाग, मुला–मुलींसाठी स्वच्छतागृह, शुद्ध पिण्याचे पाणी व शीतपेय जलसुविधा उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना आर्थिक शिस्त लावण्यासाठी ’बचत बँक’ आणि ’एटीएम सुविधा’ हे एक आगळंवेगळं उपक्रमात्मक वैशिष्ट्य आहे.

### अल्पवयीनाचा १५ वर्षांच्या मुलीवर अत्याचार

**अमरावती –** चिखलदरा पोलिस स्टेशन परिसरात एका अल्पवयीन मुलाने १५ वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्यामध्ये ती पाच महिन्यांची गर्भवतीही झाली. मुलीच्या तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, चिखलदरा पोलिस स्टेशन परिसरात राहणारी १५ वर्षांची मुलगी तिच्या घरात एकटी राहत होती. त्यावेळी अल्पवयीन मुलगा घरी येऊन लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करीत असे. त्यामुळे ती ५ महिन्यांची गर्भवती राहिली. मुलीच्या आईला हे कळताच तिने अल्पवयीन मुलाला समजावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अल्पवयीन मुलाने बदला घेण्याची धमकी दिली. त्यानंतर मुलीने चिखलदरा पोलिस स्टेशनमध्ये या प्रकरणाची तक्रार केली. पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# कॅफेत बसलेल्या १३ प्रेमीयुगुलांना पकडले

**समज देत दिले पालकांच्या ताब्यात**



शहर पोलिस महिला आणि मुलांच्या सुरक्षिततेबाबत अत्यंत सजग असून, सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.

**दिप्ती ब्राम्हणे,**
**पोलिस निरीक्षक, महिला सहायता कक्ष**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. २१) –** शहरातील काही नामांकित कॅफे आणि सार्वजनिक ठिकाणी प्रेमीयुगुलांनी अनुशासनाचा भंग केल्याच्या तक्रारीनंतर भरोसा सेल व दामिनी पथकाने संयुक्तपणे कारवाई करत १३ युवक–युवतींना ताब्यात घेऊन समज देत त्यांच्या पालकांच्या ताब्यात सुपूर्द केले. ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया व उपायुक्त (मुख्यालय) कल्पना बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक दिप्ती ब्राह्मणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

गोपनीय माहितीच्या आधारे राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील बर्गर लँड, फ्यूजन बाईट कॅफे आणि छत्री तलाव परिसरात काही तरुण–तरुणी अनुशासनहीन वर्तन करत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर दामिनी पथकाने या ठिकाणी कारवाई करत १३ तरुण व तरुणींना ताब्यात घेतले. पोलिसांनी या सर्व तरुणांना महाराष्ट्र पोलिस प्रतिबंधक कायद्यानुसार ताब्यात घेऊन आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. नंतर त्यांना योग्य समज देत त्यांच्या पालकांच्या ताब्यात सोपवण्यात आले. या कारवाईत महिला पोलिस कर्मचारी पूजा सपकाल यांचाही महत्त्वपूर्ण सहभाग होता. महिला, विद्यार्थीनी व बालकांनी कोणत्याही प्रकारच्या छेडछाड, त्रास किंवा अनुचित वर्तनाला बळी पडल्यास भयभीत न होता तात्काळ पोलिस हेल्पलाईन ११२, १०९१ किंवा १०९८ वर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस आयुक्तालयाने केले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# सायरन, स्फोट आणि मृत्यूचे तांडव

इस्त्रायलमधील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे शहर असलेल्या तेल अवीवच्या समुद्रकिनाऱ्यावर मोठी गर्दी होती. १५ जूनपासून सुरू झालेल्या इस्त्रायल-इराण युद्धात तेल अवीव हे इराणकडून सर्वाधिक हल्ले झाले आहेत. तरीही, लोक समुद्रकिनाऱ्यावर शांततेचे क्षण घालवण्यासाठी आले होते. संध्याकाळी ६ वाजता अचानक सायरन वाजू लागला. लोकांमध्ये चेंगराचेंगरी झाली. सर्वजण धावत समुद्रकिनाऱ्यावर बांधलेल्या बंकरमध्ये लपले. सुमारे ३ मिनिटांनी, एक मोठा स्फोट झाला.

-------------

गेल्या एका आठवड्यापासून सायरन, अलर्ट, स्फोट आणि बंकर, इस्त्रायलमधील लोकांचे जीवन यापुरते मर्यादित आहे. शाळा, महाविद्यालये, कार्यालये सर्व बंद आहेत. 'बूम.. बूम.. बूम, ऑल द टाइम, एव्हरीवेअर', म्हणजे सर्वत्र, नेहमीच स्फोट होत असतात, असे एक इस्त्रायली तरूणी सांगते . इराणने ४ लाख लोकसंख्या असलेल्या तेल अवीववर सर्वाधिक हल्ले केले आहेत. इस्त्रायली संरक्षण प्रणाली आयर्न डोमने क्षेपणास्त्रे रोखली, तरीही काही क्षेपणास्त्रे निवासी भागात पडली.

इराण आणि इस्त्रायलमधील सुरू असलेल्या तणावाचे रूपांतर १३ जून रोजी युद्धात झाले. इस्त्रायल आणि इराण सीमा सामायिक करत नाहीत, दोघांमध्ये सुमारे १८०० किमी अंतर आहे. त्यामुळे इराण आणि इस्त्रायलमध्ये क्षेपणास्त्र युद्ध सुरू आहे. आकाशात उडणाऱ्या क्षेपणास्त्रांमुळे दोन्ही देशांचे हवाई क्षेत्र बंद आहे.

इस्त्रायलची सीमा चार देशांना स्पर्श करते. इजिप्त दक्षिणेस आहे. गाझामधील इस्त्रायली कारवाईमुळे, इजिप्तला लागून असलेल्या रफाह सीमेवरून इस्त्रायलमध्ये प्रवेश बंद आहे. लेबनॉन इस्त्रायलच्या उत्तरेस आहे, जिथे हिजबुल्लाहचे नियंत्रण आहे. लेबनॉन आणि इस्त्रायल हे शत्रू देश आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये कोणताही सीमा तपासणी बिंदू नाही, म्हणजेच कोणताही मार्ग नाही.

सीरिया हा इस्त्रायलच्या ईशान्येला आहे. सीरिया हादेखील इस्त्रायलचा शत्रू देश आहे. इस्त्रायलने सीरियाच्या गोलान हाइट्सवर कब्जा केला आहे. त्यामुळे सीरियामधूनही इस्त्रायलमध्ये प्रवेश करण्याचा कोणताही मार्ग नाही.

जॉर्डन आणि इस्त्रायलमधील सीमा दुपारी ४ नंतर बंद होते . जॉर्डन इराण आणि इस्त्रायलच्या मध्ये आहे. त्यामुळे इराणी क्षेपणास्त्रे इस्त्रायलपर्यंत पोहोचण्यापूर्वी जॉर्डनच्या आकाशातून जातात. त्यामुळे इस्त्रायलच्या सीमेवर राहणारे जॉर्डनचे लोक घाबरले आहेत.

जॉर्डनचे नागरीक सांगतात, 'आम्ही १००% सुरक्षित आहोत असे म्हणू शकत नाही. सकाळी आणि संध्याकाळी आकाशात क्षेपणास्त्रे उडताना दिसतात. काही क्षेपणास्त्रे जॉर्डनच्या सीमावर्ती भागात पडली आहेत. यामुळे लोक भीतीच्या छायेत आहेत.'

'जॉर्डनमध्ये, सायरनही वाजत नाही. आम्हाला हवेत क्षेपणास्त्रे दिसतात आणि आम्ही सुरक्षित ठिकाणाकडे पळू लागतो. लोक बाहेर जाणे टाळत आहेत. बाहेर खूप धोका आहे, असे ते सांगतात.

'संपूर्ण इस्त्रायल इराणी क्षेपणास्त्रांच्या प्रभावाखाली आहे, घरांजवळ स्फोट होत आहेत'. 'इस्त्रायल सध्या वाईट काळातून जात आहे. युद्धामुळे शाळा, महाविद्यालये, कार्यालये बंद आहेत. भीतीमुळे लोक घराबाहेर पडत नाहीत. युद्ध जसजसे पुढे जाईल तसतशी परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते, असे इस्त्रायलच्या नागरिकांचे म्हणणे आहे.

२०२३ मधील इस्त्रायल-हमास युद्ध आणि सप्टेंबर २०२४ मधील इस्त्रायल-हिजबुल्लाह युद्धापेक्षा हे युद्ध किती वेगळे आहे? यावर नागरीक सांगतात, हमासशी झालेल्या युद्धादरम्यान, दक्षिण इस्त्रायलकडे काही रॉकेट येत असत. तेल अवीवपर्यंत फक्त काही रॉकेट येत असत. हिजबुल्लाहशी



झालेल्या युद्धादरम्यान, उत्तर इस्त्रायललाही तोच धोका आहे. आता संपूर्ण इस्त्रायल इराणच्या नियंत्रणाखाली आहे.' 'तुम्ही इस्त्रायलमध्ये कुठेही असलात तरी, तुम्ही इराणच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या रेंजमध्ये आहात. जेव्हा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे पडतात तेव्हा दृश्य खूप धोकादायक असते. त्यांचा आवाज अनेक किलोमीटर अंतरावर पोहोचतो. हे सर्व खूप भयानक आहे.'

'नवीन घरांमध्ये तळमजल्याखाली सुरक्षित घरे (बॉम्ब निवारा) बांधण्यात आली आहेत. प्रत्येक सार्वजनिक इमारतीत, कार्यालयात, रस्त्याच्या कडेला, हॉटेल्सखाली सुरक्षित घरे आहेत. सरकारने प्रत्येक घरात सुरक्षित घरे बांधण्याचे निर्देश दिले आहेत. ज्यांच्या घरी सुरक्षित घर नाही त्यांना अशा ठिकाणी राहण्यास सांगितले जात आहे जिथे सुरक्षित घर आहे.'

तेल अवीव, जे सहसा गर्दीचे आणि गजबजलेले असते, ते निर्जन झाले आहे, रेल्वे स्टेशन पूर्णपणे रिकामे दिसते आहे . तेल अवीवचे हाशलोम स्टेशन आयलॉन हायवेजवळ आहे. तेल अवीव विद्यापीठ त्याच्या शेजारी आहे. येथे सहसा गर्दी असते, पण सध्या ते रिकामे आहे.

तेल अवीव येथील शाळा, कॉलेज बंद असल्याने विद्यार्थी कमालीचे नाराज आणि संतापले आहेत. काही घरात दडून आहेत तर काही फुटबॉल खेळत असतात . ओरेन नामक १३ वर्षाचा विद्यार्थी म्हणतो, 'परिस्थिती खूप वाईट आहे, पण इस्त्रायल जिंकेल. इस्त्रायलकडे जास्त शक्ती आहे. इराण खूप वाईट आहे.

**इस्त्रायल आणि इराण का लढत आहेत?**

इस्त्रायलने १३ जून रोजी इराणवर हल्ले सुरू केले. इस्त्रायली सैन्य आयडीएफने इराणमधील अणु आणि लष्करी तळांवर हल्ला केला. यामध्ये तेहरान, नतान्झ आणि इस्फहान यांचा समावेश आहे. या हल्ल्यात २०० हून अधिक लढाऊ विमानांचा समावेश होता. इस्त्रायलचा दावा आहे की, इराण अणुबॉम्ब बनवत आहे. त्यांच्याकडे ९ बॉम्ब बनवण्याची क्षमता आहे. जर असे झाले तर इस्त्रायलला धोका वाढेल. यामुळेच त्यांनी अणु तळ आणि शास्त्रज्ञांना लक्ष्य केले.

हल्ला सुरू झाल्यानंतर, इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू म्हणाले की, इस्त्रायलने काही काळापूर्वीच ऑपरेशन रायझिंग लायन सुरू केले आहे. इस्त्रायलच्या अस्तित्वाला इराणी धोका कमी करण्यासाठी ही एक लक्ष्यित लष्करी कारवाई आहे. जोपर्यंत धोका कायम आहे तोपर्यंत ही कारवाई सुरूच राहील.

आता इस्त्रायल आणि इराणमधील युद्धाचा दुसरा आठवडा सुरू झाला आहे. इस्त्रायल हवाई हल्ले करत आहे. प्रत्युत्तरादाखल, इराण इस्त्रायलवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने हल्ला करत आहे. त्यांनी तेल अवीव आणि हैफा बंदरावर क्षेपणास्त्रे डागली आहेत.

१८ जून रोजी इराणने स्वदेशी बनावटीच्या सेजिल क्षेपणास्त्राचा वापर केला. त्याची रेंज २ हजार किमी आहे. १८ मीटर लांबीच्या या क्षेपणास्त्राला इराणहून इस्त्रायलपर्यंत पोहोचण्यासाठी फक्त ७ मिनिटे लागतात. इस्त्रायलने दावा केला की त्यांच्या सैन्याने इराणी क्षेपणास्त्र रोखले. हे युद्ध हजारों निष्पाप नागरिकांच्या अकाली मृत्यूला कारण ठरते आहे.

■ ■ ■

# प्रा. सुभाषराव बनसोड एक बहुआयामी व्यक्तिमत्व



मला अमरावतीत येऊन साधारणपणे २५ वर्षे झालीत. सुरुवातीच्या ८-१० वर्षाच्या धडपडीनंतर वैद्यकीय व्यवसायात स्थावर झाल्यानंतर प्रा. सुभाष बनसोड सरांचा परिचय झाला. त्याआधी २००० मध्ये दवाखान्याच्या बांधकामाकरिता लागणाऱ्या टाईल्स, कोटा व मार्बल्स त्यांच्याकडूनच घेतले होते. एका निष्णात यशस्वी व्यावसायिकते पलीकडे जाऊन अगदी Personal Touch देऊन त्यांनी मला मदत केली होती. फारसा परिचय व ओळख नसताना त्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावेसे वाटते.

त्यानंतर २०१० च्या दरम्यान सरांनी मला अमरावती संगीत कलोपासकचे आजीवन सभासद करुन घेतले. त्यामुळे सरांसोबत सहवास व संपर्क वाढत गेला. कोणताही आडपडदा न ठेवता मोकळेपणाने बोलणे; देहबोली प्रसन्न व प्रफुल्ल ठेवणे, कोणत्याही नर्मविनोदास खुलुन व हसून दाद देणे. ही त्यांची प्रमुख स्वभाव वैशिष्ट्ये, या गुणवैशिष्ट्यांमुळे आमचे स्नेहसंबंध दृढ व वृध्दिंगत होत गेले, तसे पाहिले तर वयाच्या दृष्टिने आम्हां दोघांमध्ये अर्ध्या पिढीचे अंतर आहे. पण सरांचा एवढा मोठेपणा की त्यांनी हे अंतर कधीच भासू दिले नाही.

हळूहळू माझा वैद्यकीय क्षेत्रामध्ये व व्यवसायामध्ये संपूर्ण बनसोड परिवार व त्यांचे आप्तस्वकीय माझ्याशी जुळत गेले. सरांची ज्येष्ठता, जनसंपर्क, सामाजिक स्थान व औद्योगिक यश या सर्वांच्या आधारे सरांना अमरावती शहर किंवा बाहेरसुध्दा कुठेही व कोणताही मोठा व निष्णात डॉक्टर, स्पेशालिस्ट व दवाखाना सहज उपलब्ध होऊ शकतो. पण आमची मने व विचार असे जुळले की मी बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ञ व प्रसुतीशास्त्र असून सुद्धा त्यांनी मला त्यांच्या कुटुंबाचा व गोतावळ्याचा फॅमिली डॉक्टर करुन टाकले.

कुठलीही वैद्यकीय अडचण असेल तर सर मला पहिले विचारतील व विचारायचे आणि मी माज्या परीने त्यांनी माज्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्याचा प्रयत्न करतो, हा त्यांचा मोठेपणा व माझ्याकरिता समाधानाची बाब आहे.

प्रा. बनसोड सर फक्त कुठल्याही एका समाजापुरते, संस्थेशी व संघटनेशी बांधील व मर्यादित राहीले नाही तर त्यांच्या समाजाभिमुख व सर्वसमावेशक मनोवृत्तीतून त्यांनी समाजातील सर्व स्तरातील घटकांशी उदा. धर्म, जात, आर्थिकस्तर, सामाजिकस्तर, पद, राजकीय पक्ष, यासर्व बाबीबाबत निरपेक्षतेने व समानते वागून आपले व्यक्तिमत्व समृध्द केले.

मी सरांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांच्या एका विशेष पैलुबाबत सविस्तर उल्लेख करु इच्छितो, तो म्हणजे सरांची कुटुंबवत्सलता.

फक्त आपल्या चौकोनी कुटुंबापुरताच विचार न करता आपले भाऊ, बहिण, जावई, भाचे, पुतणे. चुलतभाऊ मुलांच्या व मुलींच्या सासरची मंडळी, गावातील मातलग सगेसोयरे इतकेच काय तर त्यांच्या औद्योगिकः प्रतिष्ठानातील कर्मचाऱ्यांना सुध्दा ते आपल्या कुटुंबीयाप्रमाणे वागवितात. या सर्वांपैकी कुणाचाही आरोग्य विषयक प्रश्न असला तर सरांचा पहिला फोन येणार, त्याच्या उपचाराविषयी, प्रकृतीविषयी माहिती घेणार व मदत करणार.

स्वतःच्या आजारापेक्षा स्व. शरदभाऊ. प्रभाकरभाऊ, अशोकभाऊ सरांची बहिण स्व. कोकाटे यांच्या करीता त्यांची तळमळ व तगमग मी अनुभवली आहे. चि.डॉ. राहुल, सौ. मेघा, आर्या, आर्यन आजारी असले तर फोन तर करतील पण त्यांच्या माघारी येवून त्यांच्या तब्येतीविषयी प्रत्यक्ष भेटून चौकशी करणार (सौ. वहिणी मात्र त्यांची तब्येत एवढी चांगली ठेवतात की सरांना काही सेवा करायची संधीच देत नाहीत)

त्यांच्या औद्योगिक प्रतिष्ठानातील सर्व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांची ब्राम्हणवाडा येथील शाळेतील कर्मचारी, त्यांच्या शेतातील कामगार याच्या बाबतीत सुध्दा तेवढीच आस्था व तळमळ बाळगतात सर स्वतःच्या व्यवसायात, शिवाजी शिक्षण संस्थेच्या कामकाजात, ब्राम्हणवाडा येथील संस्थेचा व्याप, सामाजिक व कौटुंबिक कार्यात स्वतःला कायम गुंतवुन ठेवतात. खूप गुंतने व त्या अनुषंगाने सतत कार्यरत रहाणे यामुळे त्यांचे स्वतःचे आरोग्य आजच्या घडीला ठणठणीत आहे. त्यांना आजच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त मी व माज्या कुटुंबियांकडून हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो व त्यांच्या शुभशिवार्दाची अभिलाषा करतो.

आपले उर्वरित आयुष्य असेच आनंदाचे, समाधानाचे, कर्तव्यपूर्तीचे व आरोग्याचे जावो या करिता शुभेच्छा, आपल्या शंभराव्या वाढदिवसाला सुद्धा असाच एक लेख लिहिण्याची मनातील मनिषा ठेवून समारोप करतो.

**डॉ. संजीव बोराडे**

■ ■ ■

# श्री संत शिरोमणी नामदेव महाराज

*पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान,*
*आणीक दर्शन विठोबाचे..*
*हेची मज घडो जन्मोजन्मांतरी,*
*मागणे श्रीहरी नाही दुजे..*

संताचा महीमा अगाध आहे. जगात असंख्य संत होवून गेलेत आणी तेही

*मुखी सदा नाम संताचे दर्शन,*
*जनजनार्दन ऐवा भाव*
*नामा म्हणे तूझे नीत्य महाद्वारी,*
*किर्तन गजरी सहप्रेमाचे*
*जगाच्या कल्याणा संताच्या विभूती,*
*देहं कष्टविती परोपकारें*
*संत तेची जाना जे देही ऊदास,*
*गेले आशा पाष नीवारोणी..*

अशी ओळख संताची आपल्याला करून घेता येईल. या पैकीचं परोपकारी संत आपल्या महाराष्ट्रचे आराध्य दैवत असलेल्या पंढरपुर येथे वास्तव्यास होते आणी ते म्हणजे संत नामदेव महाराज.



संत नामदेवांचा जन्म २६ ऑक्टोबर १२७० साली परभणी जिल्हयातील नरसी बामनी या लहानश्या खेड्यांत त्यांच्या मामाचे गावी झाला. वडील दामूसेठ शींपी व आई गोणाई यांच्या नवसाला विठोबा पावला व नामदेव जन्माला आला.

*पुत्र देई ऐसा गुंडा, ज्याचा तीन्ही*
*लोकी झेंडा'*

अशा त्यांच्या मागणी प्रमाणेच त्यांना विठोबांनी पुत्र दिला होता. कारण बालपणातच नामदेवांनी आई वडीलांना विठोबाला दुध पाजायचे नीमीत्ताने विठोबाचे सगुणरुपात दर्शन घडवून दिले आणी मग तेव्हापासूनच नामदेवांचे विठोबाशी अतूट असे नाते जुळले. वयाच्या अकराव्याच वर्षी नामदेवांचे गोविंदराव सदावर्ते यांच्या राजाई नावाच्या मुलीशी लग्न झाले. त्यांना चार मुले व एक मुलगी होती. पुढे संत ज्ञानेश्वर व इतर संत मंडळीशी त्यांचा सहवास बरीच वर्षे लाभला आणी

*संताचीये पायी हा माझा विश्वास,*
*सर्वभावे दास झालो त्यांचा*

या अभंगाच्या ओळीप्रमाणे संताच्या संगतीत ते राहायला लागले व भागवत धमार्चा प्रचार व प्रसार करायला लागले. एक वेळ चंद्रभागेच्या पात्रात संत मेळ्यात सर्व समवेत जेवण करीत असतांना तुपाशीवाय चपाती नेणाऱ्या कुत्र्याच्या रुपात असणाऱ्या विठोबाला त्यांनी अचूक ओळखले हाते. तेंव्हापासून इतर संतही त्यांना खरे विठ्ठलभक्त म्हणूत संबोधत असत.

संत नामदेव भागवत धर्माची पताका घेवून भारत भर आपल्या अनुयायां सोबत फीरले. द्वारका, मारवाड़, हरीद्वार मार्गे पंजाब मध्ये जावून अमृतसर जिल्हयातील भतविंड या गावात भागवत धमार्चा प्रचार करण्यासाठी गेले असता त्याच गावातील एका अडोली नांवाच्या विधवा स्त्रीचे बोहरदास' नावाचे मुलाला नामदेवांनी मरता,मरता

वाचविले व त्याला अनुग्रह दिला.. बाजुच्या घुमान या गावामध्ये बोहरदासाने संत नामदेवाचे भव्य दिव्य असे एक मंदीर बांधले. अजुनही त्या मंदीराचे कामकाज बोहरदासाचे वंशज पाहतात. संत नामदेव घुमान येथे १० वर्षे होते ते संक्रातीचे दिवशी पंढरपुरकडे रवाना झाले म्हणून घूमान या गावी संक्रातीचे दिवशी यमुनांमधे पायी भव्य यात्रा भरते.

संताच्या समवेत त्यांनी बरीच तीर्थे केली. त्याची आठवण म्हणून तीर्थावळी या अभंगामध्ये त्यांनी रचना केली आहे. त्यांच्या भक्तीमध्ये शक्ती होती. बीकानेर जवळील एका ओस पडलेल्या विहीरीस त्यांनी भक्तीच्या जोरावर पाणी लावले. औंढा नागनाथ येथील मंदीराची दिशा त्यांच्या किर्तनानेच बदलली हे सर्वश्रुत आहेच. ते आपल्या अभंगात म्हणत

*नामा म्हणे तया असावे*
*कल्याण,*
*ज्यामुखी नीधान पांडुरंग*

संत ज्ञानेश्वरांचे चरीत्र लिहीणारे पहीले कवी संत नामदेव... अहो त्यांनी तर पंजाबात जावून नामदेवकी मुखबानी हा ग्रंथ लीहीला. त्यांनी आपल्या जीवनात २३७५ अभंगाची रचना केली. अलीकडेच अकोला जिल्हयातील कानशीवणी गावा जवळील खेर्डा भागाई या लहानश्या खेड्या बाहेरील एका नदीचे प्रवाहात एका शेतकऱ्याला सुंदर अशी नामदेवाची पाषाणाची मुर्ती सापडली. त्याने गावकऱ्यांना सांगीतले गावकऱ्यांनी ती मुर्ती गावात नेवून गावात छानसे लहानसे मंदीर बांधले आणी आता तर मंदीराचे मोठ्या देवालयात रूपांतर होत आहे असे समजले.

ते नेहमी म्हणत....

*नामा म्हणे केशवराजा, केला नेम चालवी माझा*

असे हे विठ्ठलभक्त नामदेव १२७० ते १३५० म्हणजेच ऐंशी वर्षे जीवन जगले. आणी शेवटी १३५० मध्ये पंढरपुरात विठ्ठल चरणी लीन झाले. संत नामदेवांच्या किर्तनात श्रोते वर्ग तर मुग्ध होतच पण प्रत्यक्षात पांडुरंगही नाचतअसे आणी म्हणून तर म्हटले आहे

*नामदेव किर्तन करी,*
*पुढे देव नाचे पांडुरंगा*

-------------

**महेश हरिभाऊ खंडाळकर**
**दहिगाव, तेल्हारा, जि. अकोला.**
**९६०४३७३९५५**

■ ■ ■

एखाद्या व्यक्ती कडे मर्यादेपेक्षा जास्त सोनं असल्याच्या माहिती वरून

# इन्कमटॅक्स घरी धाड टाकू शकतात का?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**

आपण गेल्या काही आठवड्यांपासून सोन्या मधील गुंतवणूक व इन्कमटॅक्स या बद्दल सविस्तर अभ्यास करत आहोत.

आपण अत्यंत महत्वाचा व चर्चिला जाणारा विषय बघितला की विवाहित महिला, अविवाहित महिला आणि पुरुष यांना माफी लिमिट मध्ये (exemption limit) किती सोनं कशा प्रकारे व कोणत्या फार्म मध्ये ठेवता येते. आज आपण पुढील अभ्यास बघणार आहोत जे व्यवहारात खूप उपयोगी ठरावे, जे इन्कमटॅक्स तथा धाडी बद्दल आहे.

**प्रश्न –** सी.बी.डी.टी. लिमिट पेक्षा जास्त सोनं आहे, या माहिती वर इन्कमटॅक्स अधिकारी घरा वर धाड टाकु शकतात का ?

■ सी.बी.डी.टी. म्हणजे सेन्ट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस असा फुल फॉर्म असुन यांनी 11 मे 1994 साली एक सर्क्युलर काढले आहे. त्या सर्क्युलर प्रमाणे आपण पूर्वीच्या लेखात बघितले आहे कि, विवाहित महिला तथा पुरुष हे किती सोन्याचे दागिने आपल्या कडे ठेवु शकतात.



आता सोप्या भाषेत प्रश्न असा आहे की एखाद्या व्यक्तीकडे सी.बी.डी.टी. यांनी घातलेल्या मयार्देपेक्षा जास्त सोन्याचे दागिने असल्याची माहिती इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना मिळाली तर या माहितीच्या आधारावर इन्कमटॅक्स अधिकारी घरावर धाड टाकु शकतात का?

घरावर टाकलेली धाड ही रात्रदिवस चालु असते कारण ही धाड इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम 132 खाली टाकलेली असते. बॉम्बे हायकोर्ट यांनी डायमंड स्टार एक्स्पोर्ट लिमीटेड विरुध्द डायरेक्टर जनरल ऑफ इन्कमटॅक्स (इन्व्हेस्टिगेशन) [2005] 278 ITR 36/[2005] 143 Taxman 16 (Bom) या केस मध्ये असा महत्वपूर्ण निर्णय दिला की फक्त माहितीच्या आधारावर इन्कमटॅक्स अधिकाऱ्यास इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम 132 खाली धाड टाकण्याचा अधिकार नाही.

इतकेच काय तर अशी धाड चुकून इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने टाकलीच तर जप्त केलेले सोने, चांदी आणि ज्वेलरी चे दागिने हे अवैध ठरवले जातील. वरील निर्णय करदात्याच्या हिताचे असुन प्रत्यक करदाता व्यक्तीस त्याची माहिती असणे अत्यंत हिताचे असल्याचे ही उच्च न्यायालयाने सांगितले.

**प्रश्न –** सोन्याचे दागिने मोजतांना इन्कमटॅक्स ऑफिसर यांनी वजनाने न मोजता पैशाने दागिन्याची किंमत ठरवली तर कायद्याने चालेल का?

■ सी.बी.डी.टी. यांनी 11 मे 1994 ला जे सर्क्युलर काढले आहे त्या अनुसार करदात्याचे दागिने हे ग्रॅम मध्ये मोजणे आवश्यक आहे. ही कायद्याची मयार्दा वजनाने आहे कारण दरवर्षी सोन्याची किंमत ही कमी जास्त होत असते. म्हणून सोन्याचे दागिने मोजतांना वजनाने मोजावे न की किंमती प्रमाणे असा सी.बी.डी.टी. सर्क्युलरचे अर्थ आहे.

पुढील लेख मालेतील अभ्यासात आपण बघणार आहोत की शेती च्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स लागत नाही मग शेतीच्या उत्पन्नातून सोन खरेदी केल्यास इन्कमटॅक्स लागतो का?

ज्या जागरूक वाचकांना काही सुचना किंवा इन्कमटॅक्स संबधी काही सुचना किंवा इन्कमटॅक्स संबधी काही प्रश्न विचारायचे असतील त्यांनी 9422218428 या नंबर वर फक्त whatsapp message करावे,

■ ■ ■

## पावसाळ्यात चुकूनही खाऊ नका या डाळी



पावसाळ्यात कोणते पदार्थ खावेत आणि कोणते पदार्थ खाऊ नयेत याची विशेष काळजी घेतली पाहिजे. अनेक लोक तक्रार करतात की डाळी खाल्ल्यानंतर त्यांना पोटात गॅसची समस्या उद्भवते. अशा परिस्थितीत, विशेषतः पावसाळ्यात, आपल्याला कळेल की कोणत्या डाळी खाऊ नयेत.

बहुतेक लोकांना राजमाची चव आवडते, पण ती पचायला जड असते. पावसाळ्यात राजमा खाल्ल्याने पोटात गॅस आणि जडपणा येऊ शकतो. म्हणून राजमा खाणे टाळावे.

बहुतेक लोकांना राजमाची चव आवडते, पण ती पचायला जड असते. पावसाळ्यात राजमा खाल्ल्याने पोटात गॅस आणि जडपणा येऊ शकतो. म्हणून राजमा खाणे टाळावे.

या सर्वांव्यतिरिक्त, उडदाची डाळ पचण्यास सर्वात जड मानली जाते. पावसाळ्यात ही डाळ पचवणे खूप कठीण असते. यामुळे गॅस, अपचन आणि पोटदुखीच्या तक्रारी होऊ शकतात.

राजमा आणि उडीद डाळ व्यतिरिक्त, पावसाळ्यात हरभरा खाणे देखील टाळावे. हरभरा डाळ खाल्ल्याने अपचन आणि पोटात जळजळ होण्याची समस्या वाढू शकते.

जेव्हा जेव्हा तुम्ही बीन्स खाता तेव्हा ते उकळताना तयार होणारा पांढरा फेस काढून टाका. या फेसामुळे अपचन आणि गॅस होऊ शकतो.



याशिवाय, डाळींमध्ये हळद, हिंग, जिरे आणि आले असे मसाले घाला, ज्यामुळे ते पचण्यास सोपे होतात. पावसाळ्यात आरोग्याची विषेश काळजी घ्या.

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## होल्डींग्ज

**अनधिकृत**
**होल्डींग्जवर लावावा**
**नगरपालिकेने दंड**
**शहराच्या**
**विद्रुपीकरणाला**
**बसेल काही**
**अंशी खंड ..!**

**सुंदर व स्वच्छ**
**शहर आपले ठेवू या**
**घंटा गाडी मध्येच**
**कचरा सारा टाकू या ..!**

## धर्माधिष्ठित सैनिक शिक्षणाची आज गरज

**वाचक लिहितात**

आजच्या तरुण पिढीकडे पाहिले, तर ती शरीर कमावण्यासाठी जिममध्ये जाते, कराटे, ज्यूडो अशा कला शिकते. मात्र, या शारीरिक ताकदीसोबत मानसिक शिस्त, त्यागाची भावना आणि समाजासाठी काही करण्याची प्रेरणा दिसत नाही. बरेच लोक या कला शिकतात, पण त्या कौशल्यांचा वापर समाजाच्या रक्षणासाठी फारसा होताना दिसत नाही.

सध्या महाराष्ट्र सरकारने विद्यार्थ्यांना पहिलीपासूनच सैनिकी शिक्षण देण्याचा विचार सुरू केला आहे. हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, हे शिक्षण केवळ सैनिकी मर्यादित न राहता त्याला धर्मशिक्षणाची जोड दिली गेली पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या मातोश्री जिजाऊंनी रामायण, महाभारत यांसारख्या धर्मग्रंथांमधून नीती, शौर्य, त्याग यांचे शिक्षण दिले. त्याचवेळी दादोजी कोंडदेव यांनी त्यांना युद्धकलेचे आणि राज्यकारभाराचे शिक्षण दिले. या दोन्ही शिक्षणातूनच हिंदवी स्वराज्याची बीजे रोवली गेली. त्यामुळे प्रत्येक हिंदू विद्यार्थ्याला धर्म आणि शौयार्चे शिक्षण मिळाले, तर तोही देशासाठी मोठे कार्य करू शकेल.

सैनिकी शिक्षणासोबत धमार्धारित नीतीमूल्यांचे शिक्षण मिळाले, तर अशा संतुलित शिक्षणातून शूर, सुसंस्कृत आणि समाजहिताची भावना असलेली पिढी तयार होईल.

■ **सौ. रमा देशमुख**
**नागपूर.**

# मालखेड-दहिगाव ते धानोरा मार्गाची दुरवस्था







## प्रवाशांचे हाल, अपघातांचा धोका

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे,(दि.२१)** – तालुक्यातील मालखेड-दहिगाव ते धानोरा हा प्रमुख मार्ग सध्या अत्यंत खराब स्थितीत असून, रस्त्याची अक्षरशः उखडलेली अवस्था ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम करत आहे. रस्त्यावर जागोजागी खोल खड्डे, सैल पडलेले दगड आणि धुळीचे साम्राज्य पसरले असून, यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना दररोजचा प्रवास संकटमय ठरतो आहे.

या रस्त्याचा वापर शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, वृद्ध नागरिक तसेच रुग्णवाहिका सेवेसाठी मोठ्या प्रमाणात होतो. परंतु, रस्त्याची झालेली दयनीय अवस्था पाहता, कोणतीही वैद्यकीय आपत्कालीन सेवा वेळेत पोहोचणे कठीण झाले आहे. यामुळे जीवितहानीचा धोका अधिकच वाढला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ग्रामस्थांनी रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी सातत्याने केली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि प्रशासनाकडे निवेदने देण्यात आली, परंतु अद्याप कुठलीही ठोस कारवाई झालेली नाही. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त होत आहे.

### पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर भीती

सध्या पावसाळा सुरू होण्याच्या उंबरठ्यावर आहे आणि अशा स्थितीत रस्त्यावर साचणारे पाणी, गचपण आणि अदृश्य खड्डे अपघातांचे प्रमुख कारण ठरू शकतात. काही दिवसांपूर्वीच या मार्गावर दुचाकीस्वार अपघातग्रस्त झाल्याची घटना घडली असून, नागरिकांनी प्रशासनाला याचा इशाराही दिला आहे.

### नागरिकांची मागणी

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे विनंती केली आहे की, जरी संपूर्ण रस्ता नव्याने बनवता आला नाही, तरी तातडीने डागडुजी, खडी टाकणे आणि खड्डे बुजवणे यासारख्या प्राथमिक उपाययोजना करून नागरिकांच्या हालअपेष्टा कमी कराव्यात. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

# मनरेगा कामाचे २१.९७ कोटी रुपये थकीत

## मजुरांना रोजंदारीसाठी प्रतीक्षा



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.२१)** – अमरावती जिल्ह्यात मनरेगा अंतर्गत विविध कामांवर काम करणाऱ्या शेकडो मजुरांना काम पूर्ण केल्यानंतर सहा महिने उलटून गेले तरीही त्यांचे थकीत वेतन मिळालेले नाही. जिल्हा रोजगार हमी कार्यालय कडून मिळालेल्या माहितीनुसार, वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये एकूण १३.३७ कोटी रुपये, तर जानेवारी २०२५ ते जून २०२५ या कालावधीत ८.५९ कोटी रुपये अशी एकूण २१.९७ कोटी रुपयांची थकीत रक्कम शिल्लक आहे. यामुळे अनेक मजुरांना आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागत आहे.

थकीत वेतनामुळे जिल्ह्यातील एका मजुराने आत्महत्या केली होती. या घटनेनंतर प्रशासनाने त्वरित वेतन देण्याचे आश्वासन दिले होते, परंतु त्यानंतरही अनेक मजुरांना आजतागायत थकीत रक्कम मिळालेली नाही. या परिस्थितीमुळे मनरेगाचे कार्यरत असलेले मजूर मानसिक आणि आर्थिक दबावाखाली आहेत.

### मजुरांची संख्या व कामांची स्थिती

सध्या मनरेगाअंतर्गत ६,९४० कामे सुरू असून, त्यावर ४१,७३२ मजूर कार्यरत आहेत. यामध्ये २१८ अपंजीकृत कामगार आणि ८,३६४ पंजीकृत मजूर समाविष्ट आहेत. जिल्हा रोजगार हमी कार्यालयाने सांगितले की, वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये २,५३,३०० कामगारांना १ कोटी ३२ लाख ४२ हजार २६९ मनुष्य दिवसांचे रोजगार उपलब्ध झाले होते, तर २०२५च्या जानेवारीपासून १,४३,६३३ मजुरांना ३० लाख ८५ हजार ९७६ मनुष्य दिवसांचे रोजगार देण्यात आले आहेत.

### पावसाळ्यात कामांची कमी

पावसाळ्याच्या काळात मनरेगाअंतर्गत कामे कमी होतात कारण मजुरांना शेतीसंबंधी कामे मिळतात. तथापि, जे मजूर शेतीच्या कामामध्ये सहभागी होऊ शकत नाहीत, त्यांना वृक्षारोपण या कामावर नेमले जाते. उपजिल्हाधिकारी रोह्यो ज्ञानेश्वर घ्यार यांनी सांगितले की, 'पावसाळ्यातही १० ते १४ हजार मजुरांना रोजगार उपलब्ध होतो.'

अर्थसंकल्पीन सहाय्य प्राप्त होताच, काही दिवसांत अकुशल कामगारांचे थकीत वेतन वितरित करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल.

**ज्ञानेश्वर घ्यार,**
**उपजिल्हाधिकारी रोहयो, अमरावती.**



# आ. संजय खोडके यांनी रक्तदान करुन सरन्यायाधीशांना मानवंदना

## न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांचा २५ जून रोजी होणार सत्कार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.२१)** – देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या २५ जून रोजी होणाऱ्या सत्कार सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्हा वकील संघातर्फे २० व २१ जून रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस आणि आमदार संजय खोडके यांनी स्वतः रक्तदान करत न्यायमूर्ती गवई यांना मानवंदना अर्पण केली.

बार कौन्सिल अमरावती येथे आयोजित या रक्तदान शिबिरात आ. खोडके यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकीची जाण दाखवली. ङ्गकुठल्याही विधायक कार्याला सामाजिक मूल्यांची जोड द्यायची असेल तर रक्तदानासारखा प्रभावी मार्ग नाही. अमरावतीचे सुपुत्र सरन्यायाधीश झाले, ही जिल्ह्याच्या अभिमानाची बाब आहे. त्यांच्या सन्मानार्थ रक्तदानाचा उपक्रम समाजाला नवा संदेश देणारा आहे,ङ्ख असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

शिबिरादरम्यान आ. संजय खोडके यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमल गवई, जिल्हा रक्तदान समितीचे अध्यक्ष महेंद्र भुतडा, वकील संघाचे अध्यक्ष अॅड. सुनील देशमुख, सचिव अॅड. अमोल मुरळ, अॅड. प्रशांत देशपांडे, तसेच अॅड. किशोर शेळके, अॅड. ब्रिजेश तिवारी, अॅड. प्रदीप प्रेमलवार, अॅड. अमित जामठीकर व अनेक मान्यवर, रक्तदाते आणि सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम न्यायमूर्ती गवई यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करत अमरावतीतील नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी पुढाकार घेऊन केलेल्या एकात्म प्रयत्नांचे प्रतीक ठरला.

# दरोड्याच्या कट उधळला; तिघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची धडक कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.२१)** – चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोनोरा-भिलटेक फाट्यानजीक अंधारात संशयास्पद स्थितीत थांबलेल्या पाच जणांपैकी तीन इसमांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडून दरोड्याच्या तयारीचा गुन्हा उघड केला आहे, तर दोन इसम मोटारसायकलसह घटनास्थळावरून फरार झाले.

गुन्हे शाखेचे पो.उप.नि. मोहम्मद तस्लीम यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. पथक बनावट सोन्याच्या गिण्यांच्या प्रकरणातील आरोपींचा शोध घेत असताना, गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई करत सोनोरा-भिलटेक फाट्याजवळ ही कामगिरी पार पडली. गोविंद दुर्योधन वाघ (२५, रा. माताफैल, रेल्वे स्टेशन, बडनेरा), हेमंत रवी भुरे (२४, रा. नवी वस्ती, झंझाडपुरा, बडनेरा), प्रेम विनोद चक्रनारायण (१९, रा. माताफैल, रेल्वे स्टेशन, बडनेरा अशी आरोपींची नावे आहेत.

या आरोपींनी दरोड्याच्या उद्देशाने तयारी केली होती, असे प्राथमिक तपासात उघडकीस आले आहे. अटक आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कार्यवाहीसाठी चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात पार पडली. कारवाईत पोलिस उपनिरीक्षक मोहम्मद तस्लीम, मूलचंद भांबुरकर, तसेच अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, चालक पो.कॉ. प्रज्वल राऊत यांचा सक्रिय सहभाग होता. फरार आरोपींचा शोध सुरू असून, या प्रकरणाचा पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन करत आहे.

### बनावट नंम्बर प्लेटचा वापर

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीवरून, पाच जण तोंडाला दुपट्टा बांधून, मोटारसायकलींवर बनावट नंबर प्लेटसह संशयास्पद रीतीने थांबले असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी अचानक झडप टाकली असता, त्यातील दोन जण गाडी घेऊन पळून जाण्यात यशस्वी झाले. मात्र, उर्वरित तिघांना पकडण्यात यश आले. आरोपींच्या ताब्यातून दोन अॅन्ड्रॉईड मोबाईल, दोन मोटारसायकली, धारदार चाकू, मिरची पूड, लाकडी काठी, बनावट नंबर प्लेट्स, चिकट पट्टी, लाल रंगाची कॉलेज बॅग असा एकुण २ लाख १० हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# आरोपी आर्मी जवानाकडून युवतीवर अत्याचार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. २१)** – फ्लॅट भाड्याने पाहण्याच्या बहाण्याने एका युवतीला बोलावून तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. याप्रकरणी आर्मीमध्ये कार्यरत असलेल्या नीलेश अशोकराव वानखडे (वय ३४) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी युवतीचा फ्लॅट गाडगेनगर भागात असून तो फ्लॅट भाड्याने देण्यासाठी ती इच्छुक होती. २२ जानेवारी रोजी आरोपी नीलेश वानखडे याने 'माझ्या मित्राला फ्लॅट पाहायचा आहे' असे सांगून तीला त्या फ्लॅटमध्ये बोलावले. फ्लॅटमध्ये गेल्यावर नीलेशने युवतीचा हात पकडून दरवाजा बंद केला आणि जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर जर हे कुणाला सांगितलेस तर तुझ्या कुटुंबीयांना मारून मी आत्महत्या करीन अशी धमकी दिली. त्याच दिवशी आरोपी पुन्हा नोकरीवर निघून गेला. मात्र, त्यानंतरही त्याने युवतीला मोबाईलवरून ब्लॅकमेल करणे सुरूच ठेवले. व्हिडीओ कॉल करून मानसिक त्रास देणे, मोबाईलवरील फोटो इतरांना दाखवण्याची धमकी देणे असे प्रकार त्याने केले. यानंतर ३ जून रोजी त्याने युवतीला फोन करून ङ्गमाझा तुझ्याशी काही संबंध ठेवायचा नाही, मला कॉल किंवा मेसेज करू नकोस असे सांगितले. याशिवाय नीलेशने आपल्या पत्नीला या संबंधात खोटी माहिती दिली. त्यानंतर ३ जून रोजी नीलेशची पत्नी संबंधित युवतीला मारण्यासाठी आली. अश्लील भाषेत शिवीगाळ करत तिला त्या परिसरातून हाकलून लावण्याची धमकी दिली, अशी तक्रारही युवतीने पोलीस ठाण्यात दिली. युवतीच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी नीलेश वानखडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# तिवसा उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटर सुरू

## किडनी रुग्णांसाठी दिलासादायक सुविधा



**तिवसा-** तिवसा उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस सेंटरची प्रत्यक्ष सुरुवात झाली असून किडनी विकारांनी त्रस्त रुग्णांसाठी ही एक दिलासादायक बाब ठरली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना आता स्थानिक पातळीवरच डायलिसिसची सुविधा मिळणार आहे. शुक्रवार २० जून रोजी गजानन चरपे (वय ५५, रा. रघुनाथपूर) या रुग्णावर पहिली यशस्वी डायलिसिस प्रक्रिया करण्यात आली. या सुविधेमुळे तिवसा व परिसरातील रुग्णांना अकोला, अमरावती, नागपूर यांसारख्या दूरच्या ठिकाणी जावे लागणार नाही. त्यामुळे वेळ, खर्च आणि प्रवासाचा त्रास टळणार आहे. येथे ८ बेड्सचे सुसज्ज युनिट व ८ आधुनिक मशिन्स उपलब्ध असून, नेफ्रोलॉजिस्ट डॉ. काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित स्टाफ रुग्णसेवा देत आहेत. ही सेवा पूर्णपणे मोफत आहे.

डायलिसिस सेंटर आता थेट तिवसा येथे सुरू झाल्यामुळे तालुक्यातील व शहरातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. पूवी मोठ्या शहरांमध्ये जावे लागायचे, आता वेळ, खर्च आणि त्रास वाचणार आहे. सर्व गरजू रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

**डॉ. शिवराज माने,**
**वैद्यकीय अधिकारी, तिवसा**

# एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यास १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. २१)** – १ एप्रिल २०१९ पूवी नोंदणीकृत जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी ) बसविणे आता बंधनकारक करण्यात आले असून, या कामासाठी १५ ऑगस्ट ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. या मुदतीनंतर एचएसआरपी बसविलेली नसलेल्या वाहनांवर नियमांनुसार कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमानवार यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. यासंदर्भातील पत्र अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालयाला प्राप्त झाले आहे.

पूर्वीचे नियमानुसार ३१ मार्च २०२५ पर्यंतच जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसविण्याची सवलत देण्यात आली होती. तथापि, वाहनधारकांचा प्रतिसाद कमी असल्याने सरकारने मुदतवाढ दिली होती. परंतु आता ही अंतिम मुदत असून यानंतर कोणतीही सवलत देण्यात येणार नाही. मुदतीनंतर वाहन तपासणी करताना, जर वाहनावर एचएसआरपी प्लेट नसेल, तर संबंधित वाहनधारकावर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. या कारवाईपासून कोणालाही वगळण्यात येणार नाही. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिका?यांना स्थानिक वाहन वितरक, ऑटो रिक्षा, बस, ट्रक यांच्यासोबत बैठक घेऊन जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### राज्यस्तरीय योगासन स्पर्धा

**अंजनगाव सुर्जी-** येथील मानवसेवा विकास फाउंडेशन द्वारे राज्यस्तरीय खुली योगासन स्पर्धा रविवार २९ जुन २०२५ रोजी मानवसेवा पॅरामेडिकल कॉलेज, लढ्ढा कॅम्पस, महेश नगर, येथे आयोजीत करण्यात आली आहे.

# १६५० गावांमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची पडताळणी

## ग्राम स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,(दि.२१)**- स्वच्छ भारत मिशन अंतर्गत केंद्र सरकारने सुरू केलेल्या स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ उपक्रमाचे अमरावती जिल्ह्यात एक महत्त्वपूर्ण पडताळणी सुरू आहे. या उपक्रमाअंतर्गत १६५० गावांमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी तयार केलेल्या सुविधांचा वापर, परिसराची स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्तीची अंमलबजावणी यावर आधारित विस्तृत पाहणी केली जाणार आहे. या उपक्रमामध्ये केंद्र शासनाचे पथक सर्व ग्रामस्थांकडून लोकसहभाग आणि श्रमदानाद्वारे या सुविधांचा पुरेपूर वापर करणार्या गावांची पाहणी करणार आहे.

दरवर्षीप्रमाणे, या उपक्रमामध्ये प्रत्येक ग्रामपंचायत सहभाग घेते. केंद्र सरकारने प्रत्येक ग्रामपंचायतीची अद्यावत माहिती घेऊन, उभारलेल्या सुविधांची तपासणी करण्यासाठी पथक जिल्ह्यात दाखल झाले आहे. स्वच्छ सर्वेक्षण प्रमाणनासाठी सर्व ग्रामपंचायतींनी आपल्या सुविधांचा प्रभावी वापर करणे अनिवार्य आहे. ग्रामपंचायतीची तपासणी केली जाईल आणि एक हजार गुणांपैकी गुणांकनाच्या आधारे जिल्ह्याचे, तसेच राज्याचे गुणांकन ठरवले जाईल. या तपासणी दरम्यान प्लास्टिक संकलन व व्यवस्थापन, कच?याचे वर्गीकरण, खतखड्ड्यांचे व्यवस्थापन, परिसर स्वच्छता आणि सांदपाणी व्यवस्थापन यावर मुख्य भर दिला जाईल. प्रत्येक गावाला १००० गुणांपैकी काही गुणांसाठी फिडबॅक व कार्यवाही केली जाईल. या गुणांकनात ग्रामस्थांचा प्रतिसाद १०० गुण, सुविधांचा वापर २४० गुण, तर तपासणी व निरीक्षण ५४० गुणांवर आधारित असणार आहे.



केंद्र सरकारच्या वतीने गाव पातळीवर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांची पाहणी केली जाईल. या सुविधांचा नियमित वापर करणे आणि स्वच्छतेची मानसिकता बदलणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक ग्रामस्थाने या सुविधांचा वापर करून परिसराची स्वच्छता सुनिश्चित करावी आणि प्लास्टिक मुक्तीची अंमलबजावणी करावी.

**संजिता महापात्र,**
**जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी.**

### शाश्वत उपायोजना आणि ग्रामपंचायतींना मार्गदर्शन

ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागासाठी आणि स्वच्छतेच्या उपाययोजनांची तपासणी करतांना, केंद्र सरकारच्या पथकाने प्रामुख्याने पुढील बाबी तपासल्या जातील. ज्यामध्ये रस्त्यावर कुठेही सांडपाणी किंवा घनकचरा पडलेला नसावा, सार्वजनिक शौचालये आणि कचरा वर्गीकरण केंद्रे नीटनेटकी असावी, सांडपाणी व्यवस्थापन, प्लास्टिक संकलन केंद्रे असावे, खतखड्ड्यांमधून खत निर्मितीचे नियोजन असावे, या सर्व बाबींचे योग्य नियोजन केले असल्यास, पुढे भविष्यकाळात ग्रामपंचायतीने या सुविधांचा शाश्वत वापर करण्याचे सुनिश्चित करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीने बचत गट किंवा इतर व्यवस्थांच्या माध्यमातून या सुविधांचा कायमस्वरूपी वापर सुरू ठेवण्यात येईल.

### कुटुंब भेटीद्वारे स्वच्छतेचा अभ्यास

ग्रामपंचायतीच्या पातळीवर कुटुंब भेटीद्वारे स्वच्छतेच्या सुविधांची स्थिती, शौचालयांचा वापर, हात धुण्याच्या सवयी, कचऱ्याचे वर्गीकरण आणि सांडपाणी व्यवस्थापन याबद्दल गुणांकन करण्यात येईल. ग्रामपंचायतींनी या सर्व बाबींचा सतत तपासणी केली पाहिजे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले आहे. स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ च्या यशस्वितेसाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्राम पाणीपुरवठा समितीच्या सदस्यांनी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. हे उपक्रम प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे गावांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतील.

# जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचा मोर्शी नगरपरिषदेच्या घनकचरा प्रकल्पास भेट

## कोपरा येथील प्रकल्पाची पाहणी



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,(दि.२१)** – अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आपल्या नियोजित प्रशासकीय दौर्याच्या निमित्ताने मोशी नगरपरिषदेच्या घनकचरा प्रकल्पास (कोपरा) भेट दिली. यावेळी त्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्याकडून सविस्तर माहिती घेतली. घनकचरा संकलन, वर्गीकरण, विघटन आणि प्रक्रिया या सर्व टप्प्यांची त्यांनी बारकाईने पाहणी केली.

प्रामुख्याने गांडूळखत प्रकल्प, एफएसटी प्लांट व एमआरएफ शेड यांचा आढावा घेत, या यंत्रणांचे कार्य कशा प्रकारे पार पडते याची माहिती घेतली. जिल्हाधिकारी येरेकर यांनी प्रत्यक्ष प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या आणि अपूर्ण असलेल्या कामांना तातडीने निधी उपलब्ध व्हावा यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश मुख्याधिकाऱ्यांना दिले. तसेच सुरु असलेल्या कामांची प्रगती पाहून समाधान व्यक्त केले. भेटीनंतर जिल्हाधिकारी येरेकर यांच्या हस्ते प्रकल्प परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी पर्यावरण रक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार, प्रभारी तहसीलदार विनोद वानखडे, नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी अमोल ढोले, आरोग्य विभाग प्रमुख नजमा शाह, वरिष्ठ लिपिक संजय भातुरकर तसेच अन्य पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ही भेट मोर्शी नगरपरिषदेसाठी प्रेरणादायी ठरली असून, घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात सुरु असलेले उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



# बालांगण

## छोटासा विमानप्रवास

नवल

विमान प्रवासाचे नाव ऐकताच आपल्या मनात आकाशात उडणाऱ्या लांब पल्ल्याच्या भल्यामोठ्या विमानांचे चित्र उभे राहते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, जगातील सर्वात लहान उड्डाण किती अंतराचे असू शकते? मुलांनो, जगात उड्डाणानंतर अगदी काही सेकंदाचा प्रवास पूर्ण करुन धावपट्टीवर उतरणारे विमान आहे. हो, आता आपण स्कॉटलंडच्या ऑर्कने बेटांवर असणाऱ्या वेस्ट्रे आणि पापा वेस्ट्रे बेटांदरम्यानच्या उड्डाणाबद्दल बोलत आहोत. हे कोणतेही सामान्य उड्डाण नाही तर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात लहान अंतराचे व्यावसायिक उड्डाण म्हणून नोंद झालेले विमान उड्डाण आहे. या प्रवासाचे अंतर अवघे २.७ किलोमीटर असून विमानाला ते पूर्ण करण्यासाठी सरासरी ८० सेकंद लागतात. वाऱ्याची दिशा अनुकूल असताना तर हा




वेळ ५३ सेकंदांपर्यंत कमी होतो.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की इतक्या कमी अंतरासाठी विमान का वापरले जाते? या दोन बेटांमध्ये कोणताही रस्ता किंवा पूल नाही आणि समुद्रही असा आहे की बोटीने प्रवास करणे शक्य नाही. म्हणूनच ही हवाई सेवा डॉक्टर, शिक्षक आणि स्थानिक लोकांसाठी एखाद्या जीवनरेषासारखी आहे. या प्रवासासाठी अगदी लहान ब्रिटन-नॉर्मन बीएन२बी २६ आयलंडर विमान वापरले जाते. त्यातून एकावेळी ८-१० प्रवासी प्रवास करु शकतात. हे अनोखे उड्डाण केवळ स्थानिक लोकांसाठीच सोयीची नाही तर जगभरातील पर्यटकांना देखील ते आकर्षित करते.

## अजबगजब आहे इथे

भन्नाट

मुलांनो, पृथ्वीवर गुरुत्वाकर्षण आहे. गुरुत्वाकर्षणाचा शोध न्यूटनने लावला. गुरुत्वाकर्षणामुळेच आपण चालू शकतो. सगळ्या वस्तू जिथल्या तिथे रहातात. चेंडू वरून खाली येतो. पण गुरुत्वाकर्षण नसतं तर... कसे राहिलो असतो आपण? वस्तू हवेत तरंगत राहिल्या असत्या. गुरुत्वाकर्षण नसताना काय होतं, याचा अनुभव आपण पृथ्वीवर घेऊ




शकतो. पृथ्वीवरच्या काही ठिकाणी शून्य गुरुत्वाकर्षण आहे. अशा ठिकाणी भन्नाट काहीतरी घडत असतं. अशाच काही ठिकाणी माहिती घेऊ या.

✻ लेहमध्ये मॅग्नेटिक हिल नावाचं ठिकाण आहे. लेह ते कारगिल रस्त्यावरच्या फक्त ३० किलोमीटरच्या या भागात गुरुत्वाकर्षण नाही. या रस्त्यावर चढ आहे. इथे वाहन आपोआप पुढे जातं. इथल्या चुंबकीय लहरींमुळे असं होत असल्याचं म्हटलं जातं. पण हा अनुभव खरंच खूप भन्नाट असतो.

✻ अमेरिकेतल्या रॅपिड सिटीमध्ये कॉसमॉस मिस्ट्री एरिया आहे. इथली काही झाडं विचित्र पद्धतीने झुकल्याचं पहायला मिळतं. इथे चेंडू खाली नाही तर वर जातो. हा प्रकार अनोखाच म्हटला पाहिजे.

✻ अमेरिकेतल्या कॅलिफोर्नियामध्ये मिस्ट्री स्पॉट आहे. हे ठिकाण पर्यटन स्थळ बनून गेलं आहे. या भागात पाणी वरच्या दिशेने वाहताना दिसतं. इथे तुम्ही खाली पडत नाही. वस्तूंचे आकार बदलतात. मिस्ट्री स्पॉटचं रहस्य अजूनही उलगडलेलं नाही.

✻ अमेरिकेतल्या फ्लोरिडामध्येच लेहसारखं एक ठिकाण आहे. स्पूक हिल या नावाने ते ओळखलं जातं.

## मोठा पल्ला गाठला

प्रेरणादायी

मुलांनो, ५२ वर्षीय नताली डो हिने १२ दिवसांत १००० किमीची मॅरेथॉन शर्यत पूर्ण करून एक मोठा विक्रम रचला आहे. या काळात तिने थायलंड, मलेशिया आणि सिंगापूर हे देश धावून पार केले. यावेळी तेथे इतके तीव्र उन्ह होते की तिचे बूटही वितळले. पण ती हरली नाही. थकली नाही. त्यामुळेच नताली डो ला थायलंड-सिंगापूर अल्ट्रा मॅरेथॉन सर्वात जलद गतीने पूर्ण केल्याबद्दल सिंगापूरचा पुरस्कार देखील देण्यात आला आहे. आता मलेशियन द्वीपकल्प पायी पार केल्यानंतर ती गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या प्रमाणपत्राची वाट पाहत आहे.

या यशाबद्दल ती म्हणते, मला खेळात आव्हाने स्वीकारायला आवडतात. मला निराशा अजिबात आवडत नाही. या स्वभावामुळेच समस्यांना न घाबरता मी ध्येय पूर्ण करु शकले. नतालीच्या धावण्याने जागतिक धर्मादाय संस्थेसाठी ५० हजार डॉलर्सपेक्षा जास्त निधी उभारला गेला आहे. चॅरिटी स्पोर्ट्सच्या मदतीने ही सगळी रक्कम महिला आणि मुलींना प्रशिक्षण देण्यासाठी वापरली जाईल. एका ध्येयासाठी धावत असताना तिला अनेक अडथळे पार करावे लागले. धावताना बीट वितळलेच त्याचबरोबर तिच्या कंबरेला दुखापतही झाली. मात्र सरतेशेवटी ती जिंकली हे विशेष. अशीच चिकाटी आणि संयम आपणही प्रत्येक कामामध्ये दाखवायला हवा.



## पर्यावरणाचे भान ठेवा

काळजी घ्या




मुलांनो, अलिकडेच आपण जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. खरेतर वर्षातील एकच नव्हे तर प्रत्येक दिवसच पर्यावरण दिन समजला जाणे गरजेचे आहे. जागतिक तापमानवाढ, हवामानातील असामान्य बदल आणि नामशेष होत जाणाऱ्या प्राणी आणि पक्ष्यांची वाढती संख्या बघता याचे महत्त्व वेगळे सांगण्याची गरज नाही. आपण पर्यावरणाचे रक्षण केले नाही तर पृथ्वीवरील जीवन राखणे कठीण होईल.

पर्यावरणाच्या संवर्धनासंबंधी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि लोकांना निसर्गाचा समतोल राखण्यास प्रेरित करण्यासाठी आता प्रत्येकानेच पुढे यायला हवे. संयुक्त राष्ट्रांनी १९७२ मध्ये हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. दरवर्षी हा विशेष दिवस एका खास थीमसह साजरा केला जातो. या निमित्ताने पर्यावरणीय समस्यांवर प्रकाश टाकला जातो. यंदाच्या पर्यावरण दिनाची थीम 'प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा' अशी आहे. ही थीम निवडण्यामागील कारण म्हणजे प्लास्टिक प्रदूषण ही आज जगातील सर्वात मोठ्या पर्यावरणीय समस्यांपैकी एक बनली आहे. प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरणाला संकटात टाकत आहे. यामुळे प्राण्यांनाही नानाविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सूक्ष्म प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी घातक ठरत आहेत.

दरवर्षी लाखो टन प्लास्टिक वापरले जाते पण त्यातील छोटासा भागच पुनर्वापरासाठी उपयोगात आणला जातो. तसेच प्लास्टिक विघटित होत नसल्यामुळे कशातही मिसळत नाही. स्वाभाविकच प्लास्टिकचे प्रदूषण वेगाने वाढत आहे. समुद्रात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक टाकले जात असल्यामुळे सागरी जीव गुदमरत आहेत. म्हणूनच प्लास्टिकचे प्रदूषण नियंत्रित करणे खूप महत्त्वाचे आहे. तुम्हीही दररोज हे भान ठेवा आणि हा कचरा टाळण्याचा प्रयत्न करा.

चित्र रंगवा



## परीक्षेची तयारी करा

कार्यानुभव

इंजिनिअरींगची पदवी मिळवल्यानंतर पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना गेट परीक्षा द्यावी लागते. गेट म्हणजे ग्रॅज्युएट ॲप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनिअरींग. इंजिनिअरींगसह तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्यांना गेट परीक्षा द्यावी लागते. गेट ही आव्हानात्मक आणि कठीण स्पर्धापरीक्षांपैकी एक. गेट परीक्षेतल्या गुणांवर सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्यांमध्ये नोकरी मिळू शकते. म्हणूनच इंजिनिअरींगमध्ये करिअर करण्याची इच्छा असणारे विद्यार्थी पुढे सरकारी कंपन्यांमध्ये नोकरी मिळवू शकतात.




✻ गेट परीक्षेतल्या गुणांच्या आधारे योग्य उमेदवारांची निवड केली जाते. या उमेदवारांची यादी तयार करून त्यांना मुलाखतीला बोलवण्यात येतं. काही वेळा गेट परीक्षेतल्या गुणांवर नोकरी मिळते.

✻ सार्वजनिक क्षेत्रातल्या ६० पेक्षा अधिक कंपन्या गेट परीक्षेतल्या गुणांच्या आधारे कर्मचाऱ्यांची निवड करतात. पण बरेच विद्यार्थी महारत्न कंपन्यांची निवड करत असल्यामुळे या क्षेत्रात खूप स्पर्धा असते.

✻ सेल, भेल, एनटीपीसी, ओएनजीसी, आयओसीएल, सीआयएल, गेल, बीपीसीएल अशा सार्वजनिक क्षेत्रातल्या आघाडीच्या कंपन्यांमध्ये तुम्हाला उत्तम संधी मिळू शकते.

ठिपके जुळवा



## निराशा दूर होईल

ध्यानात घ्या

मित्रमैत्रिणींनो; शाळेतली किंवा वर्गातली काही मुलं खूप दंगा करतात. वर्गातल्या शांत मुलांना उगाचच त्रास देतात. लहानग्यांची मस्करी करतात. एखाद्याची वही, दप्तर, पेन लपवून ठेवतात. काही मुलं दादागिरी करतात. थोडी धिटुकली मुलं त्यांची शिक्षकांकडे तक्रार करतात. काही मुलं घरी सांगतात. पण घाबरून कोणाला काही न सांगणारीही मुलं असतात. तुम्हाला कोणी त्रास देत असेल तर त्याबद्दल बोलायला हवं. शिक्षकांना, आईबाबांना सांगायला हवं. मुख्य म्हणजे यामुळे निराश होऊ नका. प्रत्येक परिस्थितीला सामोरं जायला हवं.



मुलांनो, स्वत:कडे अजिबात दुर्लक्ष करू नका. दररोज स्वत:साठी काहीतरी करा. आवडत्या गोष्टींसाठी वेळ द्या. गाणी ऐका, पुस्तकं वाचा. यामुळे तुम्हाला थोडं बरं वाटेल. ताण कमी होईल. उगाचच घरात बसून राहू नका. मैदानी खेळ खेळा. व्यायाम करा. शारीरिक हालचालीमुळे अँडॉर्फिन नावाच्या हार्मोनची निर्मिती होते. या हार्मोनमुळे आनंदी आणि उत्साही वाटू लागतं.

इतर मुलं आपल्याला का त्रास देतात, आपल्यात काही कमी आहे का, असे विचार मनात येतात. कधीकधी खूप निराश वाटतं. अशा वेळी अंगचे चांगले गुण, कौशल्यांचा विचार करा.

## फोटो येतील सुरेख

कार्यानुभव



छोट्यांनो, कुठेही फिरायला गेल्यावर तुम्ही भरपूर फोटो काढता. घरातल्या लग्नकार्यातही बरेच फोटो काढले जातात. व्हिडिओ शूट केले जातात. पण आपले फोटो आणि व्हिडिओ चांगले यायला हवेत, यासाठी काही टिप्स फॉलो करता येतील.

✻ फोटो काढताना किंवा व्हिडिओ रेकॉर्ड करताना मागच्या कॅमेऱ्याचा वापर करा. सेल्फी कॅमेऱ्याच्या तुलनेत फोनच्या मागच्या कॅमेऱ्याचं रेझोल्यूशन जास्त असतं. स्वत:चे व्हिडिओ रेकॉर्ड करण्यासाठी फ्रंट कॅमेऱ्याचा वापर होतो. पण त्याऐवजी मागचा कॅमेरा वापरा. फ्रंट कॅमेऱ्याने व्हिडिओ रेकॉर्ड करायचा असेल तर लँडस्केप मोडचा वापर करता येईल.

✻ दर्जेदार व्हिडिओ बनवण्यासाठी तो लँडस्केप मोडमध्ये रेकॉर्ड करा. पोर्टेट किंवा इतर मोडमध्ये रेकॉर्ड केलेला व्हिडिओ स्मार्टफोनमध्ये चांगला दिसतो. पण हा व्हिडिओ टीव्ही किंवा कॉम्प्युटरवर बघताना चांगला वाटणार नाही. त्यामुळे व्हिडिओ नेहमी लँडस्केप मोडमध्ये रेकॉर्ड करा.

✻ कॅमेरा हातात धरून रेकॉर्ड करण्यापेक्षा वेगळे अँगल टिपा. काही इफेक्ट्स वापरा. एकाच ठिकाणाहून रेकॉर्ड करू नका. कॅमेरा पुढे मागे करा. क्लोज अप शॉट घ्या. यामुळे तुमच्या व्हिडिओचं खूप कौतुक होईल.

## इडली आली कुठून?

खाद्यजत्रा

छोट्या दोस्तांनो, तुमच्यापैकी अनेकांना इडली खूप आवडते ना? ही दक्षिण भारताची देणगी असल्याचे अनेकांना वाटते. मात्र इडलीची उत्पत्ती इंडोनेशियामध्ये झाली आहे बरं का. आश्चर्य वाटले ना? पण हेच सत्य आहे. इसवी सन ८०० ते १२०० दरम्यान इंडोनेशियामध्ये 'केडली' नावाचा एक पदार्थ खूप लोकप्रिय होता जो आजच्या आपल्या इडलीसारखाच होता. त्याकाळी इंडोनेशियामध्ये तांदूळ आणि किण्वन प्रक्रिया करुन रोजच्या जेवणात या घटकांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे. म्हणजेच पदार्थ आंबवून वापरण्याची पद्धत



तेव्हा रुढ होती. आजची इडली त्याच पद्धतीने तयार होते.

काही सिद्धांत असेही म्हणतात की, इडली अरब देशांमधून आली आहे. अरब व्यापारी भारतात किण्वन तंत्रज्ञान घेऊन आले. त्यांनी तांदूळ आणि डाळ मिसळून किण्वन प्रक्रिया शिकली आणि इडलीसारखे काहीतरी बनवले, जे भारतात आल्यानंतर पुढे विकसित झाले.

मग ती भारतात कशी पोहोचली आणि दक्षिण भारतात इतकी लोकप्रिय कशी झाली, याचे उत्तर शोधावे लागेल. मुलांनो, इंडोनेशिया मधून भारतात आलेले लोक पदार्थ बनवण्याची ही कृती बरोबर घेऊन आले होते. भारतात आल्यानंतर त्यात काही बदल करण्यात आले आणि नंतर काही स्थानिक मसाले वापरुन तसेच वेगळ्या पद्धतींने इडली बनवली जाऊ लागली.

तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की इडलीचा पहिला उल्लेख कन्नड साहित्यात ९२० मध्ये आढळतो. त्यात या पदार्थाला 'इद्दालिगे' असे म्हटले गेले आहे.

### स्मार्ट टिप्स

#### हुशारीने करा अभ्यास



मुलांनो, अभ्यास नेहमीच खूप हुशारीने करायला हवा. फक्त घोकंपट्टी किंवा पाठांतर करून काहीच होणार नाही. अभ्यासातही स्मार्टनेस यायला हवा. यासाठी वर्गात नीट लक्ष द्या. शिक्षक शिकवत असतानाच महत्त्वाचे मुद्दे नोंदवून ठेवा. पुस्तक वाचत असतानाही तुम्ही काही मुद्दे टिपून ठेऊ शकता. यामुळे परीक्षेचा अभ्यास करताना तुम्हाला अडचणी येणार नाहीत.

### खादाडी

#### गार्लिक ब्रेड स्टीक्स



दोस्तांनो, तुम्ही वेगवेगळे पदार्थ बनवू शकता. असाच एक पदार्थ म्हणजे गार्लिक ब्रेड स्टीक्स. यासाठी सात ते आठ लसूण पाकळ्या सोलून घ्या. थोडी कोथिंबिर, १०० ग्रॅम बटर, एक चमचाभर चिली फ्लॅक्स,आठ ब्रेड स्लाईस, १०० ग्रॅम मॉझरेला चीझ, अर्धा कप उकडलेले स्वीट कॉर्न, दोन हिरव्या मिरच्या हे साहित्य घ्या. लसूण ठेचून किंवा मिक्सरमध्ये वाटून घ्या. त्यात चिरलेली कोथिंबिर, थोडं बटर, चिली फ्लॅक्स घालून नीट मिक्स करा. आता चार ब्रेड स्लाईस घ्या. या स्लाईसच्या एका बाजूला गार्लिक बटर लावून घ्या. त्यावर किसलेलं मॉझरेला चीझ घाला. थोडे मक्याचे दाणे आणि मिरच्यांचे तुकडे घाला. त्यावर दुसरा ब्रेड स्लाईस ठेवा. ब्रेडच्या वरच्या बाजूलाही गार्लिक बटर लावा. आता गॅसवर तवा ठेवा. त्यावर हे सँडविच ठेवा. दुसऱ्या बाजूलाही बटर लावून घ्या.

### दोस्त हे मस्त

#### उंटांची न्यारी दुनिया



दोस्तांनो, उंट वाळवंटात रहातात. वाळवंटात खूप कमी पाणी असतं. म्हणूनच पाणी सापडल्यावर एक उंट एकाच वेळी ४० गॅलन पाणी पिऊ शकतो. उंट एका तासात ४० मैल अंतर कापू शकतात. उन्हात गेल्यावर आपल्याला घाम येतो. पण सतत कडक उन्हात रहाणाऱ्या उंटांना घाम येत नाही. त्यामुळे त्यांना सारखी तहान लागत नाही. उंटांच्या शरीराचं तापमान १०६ फॅरनहिटवर गेल्यानंतर त्यांना घाम यायला सुरूवात होते.

### योगा टाईम

#### अर्ध चंद्रासन ठेवेल तंदुरुस्त!



योगासनांचे बरेच प्रकार आहेत. प्रत्येक योगासनामुळे वेगळे लाभ होतात. काही योगासनांमध्ये उंची वाढायला मदत होते तर काही योगासनं केल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. तुम्हाला तंदुरुस्त रहायचं असेल तर अर्ध चंद्रासन करता येईल. अर्ध चंद्रासन थोडं कठीण आहे. पण सरावाने ते सहज जमेल. मग अर्ध चंद्रासन नक्की शिकून घ्या.

# योग साधकांनी गजबजले यशवंत स्टेडियम





■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २१ :
नियमित योगासनामुळे शरीर आणि मनाचे स्वास्थ्य उत्तम राहते, अनेक आजारांना दूर ठेवता येतात याबाबत जनजागृती करणारे 'करा हो नियमित योगासन' हे गीत म्हणत शनिवारी सकाळी हजारो योगसाधकांनी योगाची प्रात्यक्षिके सादर केली. निमित्त होते नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक योग दिनाचे.

एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या संकल्पनेवर आधारित मनपाचा जागतिक योग दिन कार्यक्रम यशवंत स्टेडीयमवर शनिवारी पार पडला. यंदाच्या दशकपूर्ती सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आमदार प्रवीण दटके, पोलीस आयुक्त रविंद्रकुमार सिंगल, महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जनार्दन योगाभ्यासी मंडळाचे अध्यक्ष रामभाऊ खांडवे, माजी महापौर दयाशंकर तिवारी, भारतीय कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष संजय सिंग, कमांडंट नवीन राम, मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, उपायुक्त मिलिंद मेश्राम, गणेश राठोड,



राजेश भगत, विनोद जाधव, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, हिंद केसरी योगेश दोडके, यांच्यासह मनपाचे उपायुक्त, दहाही झोनचे सहाय्यक आयुक्त इतर कर्मचारी शहरातील विविध योगाभ्यासी मंडळचे स्वयंसेवक व हजारोंच्या संख्येत नागरिक उपस्थित होते. सामूहिक योग प्रात्यक्षिक कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

नागपूर शहर नशा मुक्त करण्याकरिता नागपूर पोलिसांकडून राबविण्यात येणाऱ्या मिशन थंडर अंतर्गत उपस्थितांना नशा मुक्तीची प्रतिज्ञा देण्यात आली. पोलीस निरीक्षक श्रीमती अनामिका मिर्जापुरे यांनी प्रतिज्ञा देवोवली.

जागतिक योग दिनाच्या आठवणींनींना उजाळा देत श्री रामभाऊ खांडवे यांनी दैनंदिन जीवनातील नियमित योगाभ्यासाचे महत्त्व सांगितले. नियमितपणे योग करण्याचे महत्व त्यांनी विषद केले. तसेच नागपुरात जनार्दन स्वामी यांच्या नेतृत्वात पहिल्यांदा योग दिन साजरा करण्याची संकल्पना मांडण्यात आली होती, अशी आठवणही त्यांनी यावेळी सांगितले.



जागतिक योग दिनानिमित्त घेण्यात आलेल्या सामूहिक योग प्रात्यक्षिक कार्यक्रमात नागपूर जिल्हा योग असोसिएशनचे अनिल मोहगावकर व संदीप खरे यांच्या चमूने योगाचे विविध मानवीय मनोरे व कठीण योगासनाचे चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विशेष म्हणजे सादरीकरण करणाऱ्या संघात अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग होता.

सर्वप्रथम मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा महानगरपालिकेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तयार केलेल्या बोधचिन्हाची प्रतिकृती प्रदान केली. तसेच महापालिकेचा मानाचा दुपट्टा प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमात महानगरपालिकेचे कर्मचारी भारत डेलीकर यांनी आशीयन योगासन चॅम्पीयनशीपमध्ये सुवर्णपदक मिळविल्याबद्दल गडकरी यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. अथर्व डाके यांनी यावेळी मुख्य कार्यक्रमाच्या पूर्वी योग गीत गायिले. त्यानंतर विविध योगासने प्रातिनिधिक स्वरूपात करवून घेतली. त्यांच्यासोबत स्टेडियममध्ये उपस्थित हजारो साधकांनी ही सारी आसने केलीत.

सुरुवातीला 'खेल खेल मे योगासन हम करते है, या गीतावर योग प्रात्यक्षिकेची सुरुवात करण्यात आली. तर प्रत्येक आसन संपल्यानंतर करा हो नियमित योगासन या योग गीताच्या शब्दांनी यशवंत स्टेडियम दुमदुमले होते. प्रसन्न आणि निरामय वातावरणात हा संपूर्ण सोहळा पार पडला.

कार्यक्रमाचे संचालन मनपाचे जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी केले तर क्रीडा अधिकारी डॉ. पियूष अंबुलकर यांनी आभार मानले.

जागतिक योग दिनाच्या निमित्ताने सकाळी ६ वाजतापासून यशवंत स्टेडियममध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ५.३० पासून यशवंत स्टेडियमकडे येणाऱ्या साधकांच्या गर्दीने धंतोली परिसरातील रस्ते फुलून गेले होते.

यशवंत स्टेडियम मध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक साधकावर पुष्पवर्षाव करण्यात आला. एका रांगेत शिस्तबद्ध रीतेने योगा करणाऱ्या साधकांच्या गर्दीने स्टेडियममधील वातावरण योगमय बनले.

**विविध मंडळांचा सहभाग**

जागतिक योग दिन कार्यक्रमात जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळ, नागपूर जिल्हा योग असोशिएशन, आरपीएफ, सीआरपीएफ, एनएचएआई, आदींनी सहभाग नोंदविला.

**यशवंत स्टेडियमवर रंगले श्वेत रंगात**

योग दिनाच्या निमित्ताने स्टेडियममध्ये एकत्रित होणाऱ्या साधकांना धवल वस्त्र परिधान करून येण्याचे आवाहन मनपातर्फे करण्यात आले होते. त्यानुसार हजारोंच्या संख्येत धवल वस्त्र परिधान करून आलेल्या साधकांमुळे स्टेडियम पांढऱ्या रंगाने व्यापले होते.

## अभिनेता तुषार घाडीगावकरची आत्महत्या

### काम मिळत नसल्याच्या तणावातून मृत्यूला कवटाळले

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :



लवंगी मिरची, मन कस्तुरी रे, भाऊबळी, उनाड, झोंबिवली आदी विविध कलाकृतींच्या माध्यमातून विविधांगी भूमिका साकारणारा अभिनेता तथा लेखक तुषार घाडीगावकर याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. हाताला काम मिळत तुषार गत काही महिन्यांपासून तणावात होता. या तणावातूनच त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती आहे. त्याच्या आत्महत्येमुळे मराठी सिनेसृष्टीवर शोककळा पसरली आहे.

तुषार घाडीगावकर हा अष्टपैलू अभिनेता होता. लेखनातही त्याचा वरचष्मा होता. छोट्या पडद्यावरील लवंगी मिरची, मन कस्तुरी रे, सुखाच्या सरींनी हे मन बावरे आदी मालिकांमध्ये त्याने काम केले होते. तर भाऊबळी, उनाड, झोंबिवली या मराठी चित्रपटांतही त्याने महत्वाची भूमिका साकारली होती.

विशेषतः संगीत बिबट आख्यान या नाटकातही त्याने काम केले होते. काही दिवसांपूर्वी एका मराठी वृत्तवाहिनीवर सुरू झालेल्या सखा माझा पांडुरंग मालिकेतही तो झळकला होता. पण काही महिन्यांपासून काम मिळत नसल्याने तो तणावात गेला होता. या तणावातूनच त्याने आत्महत्या केल्याची माहिती आहे.

तुषार हा मूळचा सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या कणकवलीचा होता. त्याने नाटकातून आपल्या अभिनय कारकिदीर्ची सुरूवात केली होती. मुंबईतील रुपारेल महाविद्यालयाच्या नाट्य विभागात तो अत्यंत सक्रिय होता. मित्रांमध्ये घाड्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुषारने कॉलेजनंतर मालिका, चित्रपट असा प्रवास सुरू केला होता. पण अचानक त्याने आत्महत्या केल्यामुळे मराठी मनोरंजन विश्वाला हादरा बसला आहे.

काही कौटुंबिक वादामुळे तो तणावात होता. काही वर्षांपूर्वी तो भांडूप सोडून पश्चिम उपनगरातील राम मंदिर येथे भाड्याच्या घरात वास्तव्याला आला होता. तो तिथे आपल्या पत्नीसोबत राहत होता. तर त्याचे आई-वडील भांडूपलाच राहत होते.

तुषारची पत्नी कामावर गेली होती. ती गेल्यानंतर तुषार घरात मद्यपान करत होता. त्याने दुपारच्या सुमारास पंख्याला लटकून गळफास घेतल्याचा अंदाज आहे. तुषारची पत्नी संध्याकाळी घरी आली तेव्हा तिला त्याचा पंख्याला लटकलेल्या अवस्थेतील मृतदेह दिसला. त्यानंतर हा सर्व प्रकार समोर आला. तुषारने नेमक्या कोणत्या कारणामुळे आत्महत्या केली, हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

## तृतीयपंथीची कळंब तालुक्यात हत्या

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २१ :
एका तृतीयपंथीयाची गळा आवळून हत्या करण्यात आली. ही घटना कळंब तालुक्यातील पिंपळशेडा शिवारातील कैलासपोड नाल्यालगत उघडकीस आली. नंदकिशोर उर्फ सोनाली अर्जुन ठाकरे (२९), रा. मोहा त. जि. यवतमाळ असे मृत तृतीयपंथीचे नाव आहे.

यवतमाळ तालुक्यातील मोहा येथील तृतीयपंथी नंदकिशोर उर्फ सोनाली हीचा कळंब तालुक्यातील पिंपळशेडा शिवारातील कैलासपोड नाल्यालगत नागरिकांना मृतदेह आढळून आला. ही माहिती मिळताच कळंब पोलिसांनी घटनास्थळी पाहाणी केली. यावेळी नंदकिशोर उर्फ सोनालीचा गळा आळवून खून केल्याची बाब समोर आली.

पोलिसांनी या प्रकरणी मर्ग दाखल केला, त्यानंतर मृतक नंदकिशोर उर्फ सोनालीची आई अनिता ठाकरे यांनी कळंब पोलिसात तक्रार दिली. तक्रारीत मृतकाचा मित्र असलेला ड्रायव्हर व मृतक नंदकिशोर यांच्यात दोन-तीन दिवसापासून किरकोळ भांडण झाल्याचे नमूद केले. त्यामुळे किरकोळ भांडणाच्या कारणावरूनच सोनालीची हत्या झाल्याची शंका व्यक्त होत आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर भारस्कर करीत आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्यासह एलसीबीतील अधिकारी, कर्मचा?यांनी कळंब गाठून घटनास्थळाची पाहणी केली. या घटनेला २४ तासाचा कालावधी लोटला असून अद्यापही मारेकऱ्यांचा सुगावा पोलिसांना लागला नाही. यातील मारेकऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्या मुसक्या आवळण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

परिसरातील चार ते पाच संशियताना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी सुरू केली आहे. मात्र त्या चौकशीत सध्या काही निष्पन्न झाले नसल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

## जन्माच्या प्रमाणपत्रासाठी महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २१ :
मुलाच्या जन्माच्या दाखल्यासाठी गेल्या काही दिवसांपासून येर-झारा माराव्या लागत असल्याने कंटाळलेल्या महिलेने थेट जिल्हा रुग्णालयाच्या तिसऱ्या माळ्यावर चढून खाली उडी मारण्याचा प्रयत्न केला. मात्र सुरक्षा रक्षकांच्या निदर्शनात ही गोष्ट आल्याने त्यांनी धाव घेत त्या महिलेला पकडून खाली आणले.

ही घटना जिल्हा रुग्णालयामध्ये घडली. मोनीका राजेश सातघरे (वय ३२) वर्ष असे त्या महिलेचे नाव आहे.

या महिलेला तिच्या मुलाच्या जन्माचा दाखला घेण्यासाठी जिल्हा रुग्णालयामध्ये असलेल्या अभिलेखा विभागामध्ये आली होती. मात्र तीच्याकडे आवश्यक कागदपत्रे नसल्याने तीला येर-झारा माराव्या लागत होत्या.

त्यामुळे कंटाळून तिने इमारतीवरुन उडी मारण्याचा प्रयत्न यावेळी केला. ती उडी मारत असल्याचे काही नागरिकांच्या लक्षात आल्याने त्यांनी आरडा-ओरड केली. यादरम्यान रुग्णालयातील सुरक्षा रक्षकांनी तिसऱ्या माळ्यावर धाव घेत त्या महिलेला खाली आणले.

## मगर इतनी गुंजाईश रहे...



**विदर्भ डायरी**
■ मनोज बागडे

मागील काही वर्षापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या म्हणून सर्वोच्च न्यायालयाचा दंडा आल्यानंतर निवडणूक आयोग आणि राज्यातील सरकार कामाला लागले . नगरसेवक म्हणून मनपा, नगरपालिकेत बसायला मिळावे या उद्देशाने राजकारणातले प्रस्थापित आणि नवखेही कामाला लागले आहेत.

महायुती म्हणून भाजपा, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस (अपराकाँ) आणि शिंदेसेना हे तिन्ही पक्ष एकत्र लढतील, असे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आधीच स्पष्ट केले आहे. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून मात्र अद्याप तशी काही घोषणा झाली नाही.

दुसरीकडे, आघाडीमधील काँग्रेस, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस (शपराकाँ) आणि उबाठा शिवसेना यांनी त्यांचे पत्ते उघडले नाहीत . उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे पूर्व विदर्भात फारसे प्रस्थ नाही. बीएमसी अर्थात मुंबई मनपावर त्यांचा डोळा आहे . त्यातून, जागा वाटपात आघाडीत बिघाडी होणार म्हणजे होणार. महायुतीत कुरबुरी नाहीत, असे नाही. येथेही प्रचंड गोंधळ आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर पक्षांतराला मोठाच वेग आला आहे. विविध पक्षातील दादा, भाऊ, भाई सरड्याचे अनुकरण करू लागले आहेत. अनेक जण कुंपणावर आहेत . या निवडणुकीची अधिकृत अधिसूचना जारी झाली नसल्याने नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अद्याप खम ठोकलेली दिसत नाही. मात्र, पूर्व विदर्भाच्या भंडारा जिल्ह्यात जिल्हा सहकारी बँक आणि जिल्हा दुध संघाच्या निवडणुकीवरून महायुतीच्याच दोन नेत्यांनी एकमेकांविरूद्ध दंड थोपटले आहेत.

भंडारा जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर आजतागायत राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिलेले आहे . जिल्हा बँक, अर्बन बँक, दुध संघ, मजूर संघ अशा सहकारी संस्था त्यांच्याच ताब्यात राहिल्यात. काँग्रेसचे नाना पटोले आणि भाजपाच्या अनेक नेत्यांनी अनेकदा प्रयत्न करूनही या संस्थावर कब्जा मिळविण्यात अपयशच आले.

अपवाद ठरले होते ते काँग्रेसचे विद्यमान खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांचे वडील स्व. यादवराव पडोळे. प्रफुल पटेलांना थेट भिडून त्यांनी दुध संघ आणि जिल्हा बँकेवर कब्जा केला होता.

आता जिल्हा बँक आणि दुध संघाची निवडणूक होवू घातली आहे . त्यात काँग्रेसच्या नाना पटोलेंनी महायुतीला भगदाड पाडत शिंदेसेनेचे भंडाराचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांना आपल्या गोटात ओढले आहे . दुसरीकडे, भाजपाचे विधान परिषद सदस्य तथा माजी राज्यमंत्री डॉ. परिणय फुके आणि जिल्हा बँकेचे विद्यमान अध्यक्ष तथा अपराकाँचे नेते सुनील फुंडे मिळून पटोले-भोंडेकर यांना आव्हान देत उभे ठाकले आहेत.

महायुतीत असतानाही आ. भोंडेकर काँग्रेसच्या गोटात शिरल्याने फुके - फुंडे यांनी त्यांच्यावर अनेक आरोप करीत घेरण्याचा प्रयत्न चालवला आहे . याला प्रत्युत्तर म्हणून आमदार भोंडेकरांनी विधानसभा निवडणुकीतील कथित गद्दारीचे फुके यांना स्मरण करून दिले आहे . आठ महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या नेत्यांनी उभा केलेला डमी उमेदवार, प्रफुल पटेलांकडून सभेसाठी नकार, अशा अनेक दडलेल्या बाबी भोंडेकरांनी बाहेर काढणे सुरू केले आहे.

२००९, २०१९ आणि २०२४ असे तिनदा निवडून येवूनही मंत्रीपद मिळाले नाही, हे भोंडेकरांचे खरे दुखणे असून, यामागे भाजपा तसेच अपराकाँच्या नेत्याचा अडथळा असल्याचे ते मानत असावेत आणि त्यात तथ्य नाही, असे नाही . जिल्ह्यात नाना पटोले कायम नाराज आत्मा आहे . १९९९ पासून चारवेळा काँग्रेसचे आमदार, एकदा भाजपाचे आमदार आणि खासदार अशी दिर्घ इनिंग खेळणारे पटोले यांना आजवर मंत्रीपद मिळाले नाही. त्यामागे, अपराकाँच्या मोठ्या नेत्याचा अडसर झाल्याचे ते सांगतात. याच वर्षीच्या प्रारंभी नाना पटोले यांनी प्रफुल पटेलांच्या अपराकाँचे पाच सदस्य फितवून भंडारा जिल्हा परिषदेची सत्ता हस्तगत केली.

जिल्ह्याच्या विविध क्षेत्रावर वर्चस्व कायम ठेवण्याच्या नेत्यांच्या या लालसेने जिल्ह्याचे मात्र पार वाटोळे झाले आहे. सनफ्लॅग, अशोक लेलॅन्ड सोडले तर जिल्ह्यात तिसरा उद्योग नाही, बिडी उद्योग, हातमागावरील विणकरी व्यवसाय इतिहासात जमा झालेत. मच्छिमारांचे नेते सूट घालू लागले, मासेमार मात्र आजही फाटक्या लंगोटीतच आहे . अर्थात कोणत्याही नेत्याला याचे सोयरसूतक नाही.

आता २८ जूनला जिल्हा दुध संघाची निवडणूक होऊ घातली आहे . भाजप - अपराकाँ यांचे सहकार विकास पॅनल आणि काँग्रेस व भोंडेकर गट मिळून स्थापन झालेले शेतकरी विकास पॅनल यांनी एकमेकांविरूद्ध खम ठोकली आहे. यातून भाजपाचे फुके आणि शिंदेसेनेचे भोंडेकर या दोन आमदारांमधील संघर्ष अधिक तीव्र होण्याचे संकेत दिसताहेत.

तथापि, या दोन आमदारांमधील दुश्मनी तहहयात कायम राहीलच असेही नव्हे . कोणे एकेकाळी भाजपाला शिव्या हासडणारे नाना पटोले २००९ मध्ये भाजपामध्ये गेले होतेच की. कायम भाजपाच्या विरोधात भूमिका घेणारे प्रफुल पटेल यांनीही महायुतीत शिरकाव केलाच. त्यामुळे, नेत्यांमधली ही भांडणे औटघटकेची असतात, सायंकाळ झाली की ते एकत्र बसतात, हा आजवरचा अनुभव आहे . यात पिसला जातो तो सामान्य कायकर्ता.

तेल लावून एकमेकांच्या विरोधात रणांगणात उतरलेले आणि आरोप प्रत्यारोप करीत एकदुसऱ्याचे कपडे उतरवणारे हे नेते उद्या एकत्र येणारच नाहीत, असे नव्हे . त्यामुळे, इतकेच काय ते सांगता येईल...

*दुश्मनी जमकर करो...*
*मगर इतनी गुंजाईश रहे...*
*जब कभी हम दोस्त बने...*
*तो शरमिंदा ना हो!*

■ ■ ■

## थेट प्रयागराजच्या बाजारपेठेत इंझाळ्याची केळी

### आयआयटीच्या विद्यार्थ्याने पाठविली आठ टन केळी उत्तर प्रदेशात

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २१ :
हिंगणघाट तालुक्यातील इंझाळा येथील युवा शेतकरी तथा आयआयटी, मद्रासचे विद्यार्थी अभिजीत रविश सरोदे यांनी आपल्या शेतातून आठ टनांहून अधिक उत्तम दर्जाची केळी उत्तर प्रदेशातील प्रयागराजच्या बाजारपेठेत विक्रीसाठी पाठवून आपल्या आधुनिक कृषीपद्धतीकडे लक्ष वेधले आहे.

परंपरागत शेतीच्या चौकटीबाहेर जाऊन अभिजीत यांनी वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करीत हे यश प्राप्त केले. योग्य पीक नियोजन, वेळेवर खत व पाण्याचे व्यवस्थापन तसेच बाजारपेठेचा सखोल अभ्यास या सगळ्याची सांगड घालत व केळीचे सर्वोत्तम पीक घेत मोठ्या बाजारपेठेवर त्यांनी आपली छाप उमटवली.

या यशस्वी वाटचालीत त्यांना 'केळी रत्न'



कुंदन वाघमारे व प्रकाशसिंग बैस यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले. या मार्गदर्शनामुळे सरोदे यांनी केळी लागवडीत नवे प्रयोग करून दर्जेदार गुणवत्ता साध्य केली.

हिंगणघाट तालुक्यातून परराज्यात करण्यात आलेली ही केळीची पहिलीच मोठी निर्यात असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ही गौरवाची बाब आहे.

युवा पिढीने रोजगारासाठी मोठ्या शहरांवर विसंबून न राहता आपल्या मूळ गावी पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास भरघोस उत्पन्न मिळवता येते, अशी भावना अभिजीत सरोदे यांनी व्यक्त केली.

त्यांच्या यशामागे आई मीनाक्षी रविश सरोदे व भाऊ शाम सरोदे यांचे सातत्याने मिळालेले प्रोत्साहन, तसेच अंकुश सायंकार व श्याम बोरकर यांची साथ लाखमोलाची ठरली आहे. त्यांच्यापासून शेतकरी प्रेरणा घेत आहेत.